मंगळवार, १२ मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १९९
आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

•MARATHI •DAINIK •CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 12 MARCH 2024 | adhunikkesari.com | •YEAR-03 •ISSUE-199 •RNI : MAHMAR/2021/82566 •PAGE-12 •PRICE-05





आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे किरणोत्सव प्रक्रिया घडत असल्याने भगवान बुद्धांच्या चेहऱ्यावर स्पष्ट सुर्य किरणे पडतात. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ही प्रक्रिया घडली आहे. प्रतिवर्षी 10 ते 12 मार्च दरम्यान सायं. 04.35 ते 5.30 पर्यंत बुद्धांच्या चेहऱ्यावर सुर्य किरणे पडतात.**

# सीएए कायद्याची अधिसूचना जारी

## नागरिकत्व मिळवण्यासाठी भारतात ११ वर्षे राहणे आवश्यक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्र सरकारने सीएएची (नागरिकत्व सुधारणा विधेयक) अधिसूचना जारी केली आहे. केंद्र सरकारकडून याबाबतची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या कायद्यात पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या ३ देशांमधील अल्पसंख्यांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद करण्यात आली आहे. धार्मिक छळामुळे या तीन देशांमधून पळ काढून भारतात आलेल्या लोकांना भारताचे नागरिकत्व दिले जाईल. हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी आणि ख्रिश्चन या सहा धार्मिक अल्पसंख्यांक लोकांना भारताचे नागरिकत्व देण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे.**



सद्यस्थितीत भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी कुठल्याही व्यक्तीला भारतात किमान ११ वर्षे राहणे आवश्यक आहे. परंतु, सीएएमुळे ही अट शिथील होऊन सहा वर्षांवर येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी केंद्रातल्या मोदी सरकारने हा एक मोठा निर्णय घेतला आहे. आता याचे कायद्यात रुपांतर होईल.

गेल्या काही दिवसांपासून देशात नागरिकत्व सुधारणा कायद्याची चर्चा ऐकायला मिळत होती. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून देशात हा कायदा लागू केला जाईल, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. आता मोदी सरकारने याच कायद्याची अधिसूचना जारी केली आहे. सरकारच्या या निर्णयानंतर सीएए कायद्यात असलेले सर्व नियम देशभर लगू केले जाणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने हा कायदा लागू करण्यासाठी आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी एक विशेष पोर्टलदेखील तयार केले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी नागरिकत्व सुधारणा कायदा लागू केला जाईल अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दोन आठवड्यांपूर्वी नवी दिल्लीत आयोजित एका सभेत बोलताना केली होती. नागरिकत्व सुधारणा कायदा हा २०१९ मध्ये संसदेत संमत करण्यात आला आहे.

पश्चिम बंगाल सरकारने सातत्याने या कायद्याचा विरोध केला आहे. केंद्र सरकारने सीएएची अधिसूचना जारी करण्याच्या काही मिनिटे आधी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुन्हा एकदा या कायद्याबाबत संताप व्यक्त केला. दुसऱ्या बाजूला, भाजपाचे सरकार असलेल्या आसाम, मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांनी सीएए कायद्याचा पुरस्कार केला आहे. तर विरोधी बाकावरील पक्षांचे सरकार असलेल्या पश्चिम बंगाल, तमिळनाडूसारख्या राज्यांनी मात्र या कायद्याविरोधात भूमिका घेतली आहे. सीएए कायदा लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी प्रतिक्रिया दिली होती की, नागरिकत्व दुरुस्ती कायद्याची तमिळनाडूमध्ये अंमलबजावणी होऊ देणार नाही. या कायद्याला तामिळनाडूत पाय ठेवू देणार नाही, त्यामुळे आता मोदी सरकारने सीएए कायद्यासंदर्भात अधिसूचना जारी केल्यामुळे स्टॅलिन यांच्यासह इतर विरोधक काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

२०१९ साली संसदेमध्ये नागरिकत्व सुधारणा कायदा पारित झाला. मात्र, कायदा मंजूर झाल्यानंतर लागलीच विरोधकांसह देशात अनेक ठिकाणी कायद्याविरोधात आंदोलने सुरू झाली. विरोधकांनी या कायद्याचा कडाडून विरोध केला. त्यामुळेच हा कायदा पारित झाला असला, तरी त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात नियमावली अद्याप स्पष्ट झालेली नव्हती. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधून ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी व ख्रिश्चन स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्यासंदर्भात या कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत.

# हळदीला अच्छे दिन कायम राहिल्यास शेतकऱ्यांना दिलासा

## नवी हळद बाजारात दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** बागायती पीकात मोडणारे हळद हे मसालावर्गीय पीक असल्याने त्याला प्रत्येक क्षेत्रात विशेष मागणी असते. त्यामुळे नगद व हमीपीक म्हणून तालुक्यात हळद लागवड क्षेत्रात कमालीची वाढ झाली आहे. रिसोड बाजार समितीत नवी हळद दाखल झाली असून, १४००० रू प्रतिक्विंटल भाव मिळाला आहे. त्यामुळे शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत. परिणामी हळदीचे अच्छेदिन असेच कायम राहिल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल असे शेतकरी बोलत आहेत.

हळद हे मसालायुक्त व औषधीगुण असलेले बहुगुणी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे हळदीला जगात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. शिवाय आपल्या भारतीय संस्कृतीत विशेष स्थान असल्याने देशात सुद्धा नेहमीच मागणी असते. त्यामुळे हळद हे नगद पीक म्हणुन ओळखले जाते.परंतु लागवड खर्च महागडा करून प्रत्यक्ष हातात येण्यास जवळपास दहा महिन्याचा कालावधी लागतो त्यामुळे या पिकास किमान पंधरा हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळणे अपेक्षित असते. मात्र मध्यंतरीच्या काही वर्षात हळदीला केवळ साडेचार ते पाच हजार रुपये प्रति क्विंटल इतका नीच्चांकी भाव मिळू लागला. परिणामी जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी हळद पिकाकडे पाठ फिरवली होती. परंतु गेल्या दोन वर्षांपासून हळदीच्या भावात बऱ्यापैकी वाढ होत गेली आणि ही तेजी कायम राहात गेल्या वर्षी रिसोड बाजार समितीत वीस हजार रुपये प्रति क्विंटलचा टप्पा पार केला होता. अपेक्षे बाहेर विक्रमी वाढ झाल्यामुळे आपसूकच यावर्षी हळद उत्पादक शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे.

प्रत्यक्ष हळद काढणीस सुरुवात केल्यापासून तयार होण्यास जवळपास एक महिन्याचा कालावधी लागतो. तेंव्हाकुठे हा शेतमाल बाजार समितीत नेण्यायोग्य होतो. आजमितीस केवळ दहा टक्के शेतकऱ्यांची हळद तयार झाली  असून, अजून नव्वद टक्के माल तयार होणे बाकी आहे. तयार झालेली नवी हळद रिसोड बाजार समितीत १४००० रूपये प्रतीक्विंटल विकल्या गेल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. मात्र

गतवर्षी हळदीचे दर सुरुवातीला सहा हजार होते . त्यानंतर



हळूहळू वाढ होत दहा हजारावर गेले त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी हळद विकून टाकली होती . मोजक्याच शेतकरयांना बारा हजार भाव मिळाला होता . यावर्षी सुरूवातीलाच पंधरा हजार रुपयांच्या आसपास मिळत असल्याने दिलासा मिळत आहे .

**भागवत नरवाडे, (शेतकरी मोप ता . रिसोड )**

**आवक वाढल्यास भाव ढासाळण्याची भीती** : बाजार समितीत कुठल्याही शेतमालाची आवक जास्त प्रमाणात वाढल्यास भाव हमखास ढासाळतात हा शेतकऱ्यांचा आजवरचा अनुभव आहे . त्यामुळे आजमितीस केवळ दहा टक्के हळदीचे पीक तयार होऊन बाजारात दाखल झाले आहे . त्याला बऱ्यापैकी भाव मिळत आहे ही समाधानाची बाब आहे . भावातील तेजी कायम राहणार ही सुद्धा एक शेतकऱ्यासाठी दिलासा दायक बाब आहे . परंतू आजवरचा अनुभव पाहिला तर ज्या शेतमालाची आवक जास्त वाढली त्याला बाजारात कवडी मोल भाव मिळतो हे सर्वश्रुत आहे . आणि अजून नव्वद टक्के हळद बाजारात येणे बाकी आहे . परिणामी पुढील काही दिवसांत बाजार समितीत हळदीची विक्रमी आवक वाढणार हे निश्चित आहे .त्यामुळे मागील अनुभव पाहता हळदीचे भाव स्थिर राहतील की ढासळतील ही भीती शेतकऱ्यांना सतावत आहे .



आंतरराष्ट्रीय पातळीवर हळदीच्या मागणीत वाढ होत असून भावातील तेजी कायम राहणार असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे हळदीचे अच्छेदिन असेच कायम राहिल्यास शेतकऱ्यांना खुप मोठा दिलासा मिळेल असे हळद उत्पादक शेतकरी बोलत आहेत.


# प्रज्ञासिंह ठाकूर यांच्याविरोधात वॉरंट

आधुनिक केसरी न्यूज

**भोपाळ :** खासदार तथा भापजाच्या नेत्या प्रज्ञासिंह ठाकूर यांच्याविरोधात मुंबईतील विशेष न्यायालयाने जामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. २००८ साली झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात त्या आरोपी आहेत. न्यायलयीन सुनावणीदरम्यान वेळोवेळी अनुपस्थित राहिल्यामुळे न्यायालयाने त्यांना हे वॉरंट जारी केले आहे. प्रज्ञासिंह ठाकूर तसेच मालेगाव बॉम्बहल्ल्यातील अन्य आरोपींना मुंबईच्या विशेष न्यायालयाने सोमवारी हजर राहण्याचा आदेश दिला होता. प्रज्ञासिंह ठाकूर सोमवारी न्यायालयात हजर राहिल्या नव्हत्या. त्याऐवजी ठाकूर यांच्या वकिलाने प्रज्ञासिंह यांची प्रकृती ठीक नसल्याचे सांगत सूट देण्याची मागणी केली होती. विशेष न्यायाधीश ए के लाहोटी यांनी मात्र हा अर्ज फेटाळत प्रज्ञासिंह ठाकूर यांच्याविरोधात जामीनपात्र वॉरंट जारी केले.




## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

लोकांमध्ये बलोपासनेची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनी गावोगावी मारुतीची स्थापना केली. आखाडे सुरु केले. मारुतीरायांच्या उपासनेतून प्राप्त झालेल्या सामर्थ्याचा उपयोग कसा करायचा हे समजण्यासाठी रामोपासनेचे महत्व सांगितले. राम आणि मारुती यांच्या उपासनेद्वारे लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण करून समर्थांनी जणू मातीच्या पुतळ्यांमध्ये प्राण फुंकले. राम आणि मारुती यांच्या उपासनेत लोकसंग्रह, समाजकल्याण, मानवता आणि राजकारण ही सर्व तत्वे समर्थांना अंतर्भूत आहेत असे वाटले. रामराय तर समर्थांच्या मनीध्यानी सतत होतेच. आता जनतेलाही रामभक्तीचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांनी कृष्णातीरी कार्य सुरु केले. समर्थांचे भारतभ्रमण झालेच होते. त्यातून आलेल्या अनुभवातून ते उद्‌गारले बहू हिंडता सौख्य होणार नाही । शिणावे परी नातुडे हीत काही । विचारे बरे अंतरा बोधवीजे । मना सज्जना राघवी वस्ती कीजे ।। समर्थ म्हणतात सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।। या दोन ओळी अतिशय महत्वाच्या आहेत. यात दोन गोष्टींची मागणी समर्थांनी रामाकडे केली आहे. पहिली म्हणजे सदासर्वदा तुझे सान्निध्य असावे. तुझा आणि माझा कधीही वियोग होऊ नये. आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुझ्या कारणात म्हणजेच तुझ्या कार्यातच माझे आयुष्य व्यतीत व्हावे. समर्थांच्या चरित्राकडे दृष्टिक्षेप टाकला असता त्यांच्या या दोन्ही मागण्या रामरायाने पूर्ण केल्याचे दिसते. रामाचा आणि त्यांचा कधीही वियोग झाला नाही. श्रीरामांचे चरित्र, त्यांचा आदर्श ,त्यांची शिकवण यांचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. आपले आयुष्य त्यांनी त्यातच व्यतीत केले. श्रीरामाची उपासना करताना त्यांनी श्रीरामांपुढे किती सुंदर आणि भव्य मागणी केली आहे पहा !

**कोमळ वाचा दे रे राम । विमळ करणी दे रे राम ।।**
**प्रसंग ओळखी दे रे राम । धूर्त कळा मज दे रे राम ।।**
**मागो नेणे दे रे राम । मज न कळे ते दे रे राम ।।**
**तुझी आवडी दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम ।।**




## आनंदी पहाट



# नोकरी मिळविण्यासाठी अनेक पर्याय

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

तुम्हाला सक्षम बनवण्याचा विचार केल्याने, तुम्हाला विशिष्ट भूमिका आणि करिअर टार्गेट करण्यासाठी तुमचा शोध कमी करण्यात काही बाबातीत मदत होऊ शकते. तुम्हाला कोणत्या प्रकारच्या उद्योगांचा किंवा भूमिकांचा अनुभव आहे किंवा तुम्हाला कशात स्वारस्य आहे; त्याबद्दल विचार करणे आवश्यक असते. एकदा तुम्हाला तुमच्या करिअरची उद्दिष्टे आणि तुम्हाला कोणत्या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये स्वारस्य आहे; याची चांगली कल्पना आली, की तुमचे अनुभव या भूमिकांमध्ये कसे उपयुक्त ठरू शकतात याचा विचार करा. नोकरी मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत. तुम्ही कोणत्या प्रकारची नोकरी करत आहात हे सर्वस्व उद्योग आणि नोकरीची स्पर्धात्मकता यावर अवलंबून असते त्याप्रमाणे दृष्टिकोन बदलू शकतात. काहींना त्यांच्या नोकरीच्या शोधात नेटवर्किंग आणि वैयक्तिक परस्पर संबंध प्रभावी वाटू शकतात, परंतु बरेच लोक नोकरीचा अर्ज करण्यासाठी आणि मुलाखत घेण्याच्या पारंपारिक दृष्टिकोनावर अवलंबून असतात. ही प्रक्रिया त्रासदायक असू शकते, परंतु या धोरणांमुळे तुमचा प्रवास सुरू होताना तुम्हाला स्पष्टता आणि आत्मविश्वास मिळू शकतो. तुम्ही प्रवेश परीक्षेस बसण्याचा विचार करत असल्यास आणि तुम्ही पात्र असलेल्या कोणत्याही नोकरीसाठी अर्ज करण्याचा प्रयत्न करत असल्यास, तुमच्या करिअरच्या आशा आणि स्वप्नांचे आकलन करण्यासाठी वेळ काढणे हा नोकरी शोध सुरू करण्याचा अधिक समाधानकारक आणि फलदायी मार्ग असू शकतो. तुमची हस्तांतरणीय कौशल्ये ओळखा, ज्यात तुम्ही तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात संपादन केलेली तांत्रिक कौशल्ये आणि कामाच्या ठिकाणी कौशल्ये यांचा समावेश आहे. जर तुम्ही तुमची पहिली नोकरी शोधत असाल, तर तुमची हस्तांतरणीय कौशल्ये अभ्यासक्रमाबाहेरील क्रियाकलाप, स्वयंसेवक म्हणून काम करून दैनंदिन जीवनात आनंद देऊ शकतात.



आधुनिक केसरी


## संजीवन झाला | कृपावंत ||

निर्गणाची वाट | सगुणी सापडे ||
अद्वैताचे कोडे | सोडविण्या ||१||
भक्तीने करता | कर्माचे पुजन ||
ज्ञानाचे चंदन | गंधाळते ||२||
चंदनाचा गंध | जाणता आत्म्याला ||
जाग स्वधर्माला | येते जाण ||३||
सुख दुःखा आता | जागा न राहिली ||
स्थितप्रज्ञ झाली | काया वाचा ||४||
मौनाची महती | आकळली ज्याला ||
संजीवन झाला | कृपावंत ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज





गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### अष्टपैलू मोरेदादा


पृथ्वीला आपण 'वसुंधरा' म्हणजे 'रत्नांची खाण' म्हणतो. अशा उज्ज्वल परमेश्वरी सामर्थ्याच्या नररत्नाला जन्म देणारी, वाढविणारी 'आई' अशा उदात्त पृथ्वीरूपाची साकार, सजीव मूर्ती असते. याचा अनुभव मोरेदादांच्या मातोश्रींच्या जीवन कार्यातून प्राप्त होतो. वयाच्या आठव्या वर्षापर्यंत दादांनी श्री रामरक्षा,विष्णुसहस्रनाम, मनाचे श्लोक, भगवद्‌गीता इत्यादी अस्खलितपणे मुखोद्‌गत केले होते.अनेक प्रकारचे सत्संग, कीर्तने-प्रवचने, पारायणे, पठण-वाचन यात सहभागी होऊन या लहान बालकाने तल्लख बुद्धीने त्यांचे योग्य ग्रहण व स्मरण केले होते. शंकराचार्यांसमोर या बालकाने संस्कृत गीता, स्तोत्रे, मंत्र, विष्णुसहस्रनाम न अडखळता, न घाबरता, न चुकता म्हणून दाखवले म्हणून त्यांची पाठही आचार्यांनी थोपटली होती. शाबासकी देऊन जाहीर कौतुक केले होते. एकदा पावसाळ्यात शेतात काम करतांना आईच्या अंगावर वीज कोसळली तेव्हा फक्त आठ वर्षांचे दादा व त्यांची 10 वर्षांची बहीण जवळ होते. न घाबरता पडत्या पावसात दादांनी डॉक्टरांना लगेच बोलावले व डॉक्टर आल्यानंतर उपचारांबरोबर आईच्या नाडीवर श्रद्धेने, एकाग्रतेने रामरक्षेची आवर्तने सुरू केली. आश्चर्य की बेशुद्ध झालेल्या आई काही वेळाने शुद्धीवर आल्या. प्राणघातक प्रसंगातून वाचल्या. याठिकाणी त्या बालकाचे धैर्य, प्रसंगावधान, श्रद्धा, निष्ठा, गांभीर्य, संयम इत्यादी गुण फार प्रशंसनीय आहेत. लहानपणापासून इतरांचे प्रश्न, अडचणी जाणून घेणे, मदत करणे, स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणे, ही लोककल्याणाची आस  दिसून येत होती. बालसंस्काराचे कार्य या मार्गात अशा स्वानुभूत साक्षात्काराच्या पायावर उभे आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बायें वीणा मुरली, मधुर मनोहर राग । सुखद सरस स्वर बाजती, बाढ़े सुरति सोहाय ।।२९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/२९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ब्रह्मांडात डावीकडे वीणा आणि मुरलीचा मधुर सरस सुखद ध्वनी होत आहे ज्यामुळे सौभाग्यवती सुरतिचे सौभाग्य वाढत आहे.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# प्रपंचात स्त्रीने कसे वागावे ?

आधुनिक केसरी



पतिसेवा हाच आपला धर्म । प्रपंचाचे कर्तव्य हेच आपले सत्कर्म । अंतरी समाधान हेच आपले साधन ॥ सर्वांनी राहावे सुखी । रामनाम नित्य घ्यावे मुखी ॥ सर्व सुखाचा लाभ । घरबसल्या मिळतो देव ॥ कर्तव्यी असावे तत्पर । मुखी नाम निरंतर ॥ देहाने करावी सेवा । याहून दुजा लाभाचा नाही ठेवा ॥ परमात्म्याने जे जे दिले । ते ते त्याचे म्हणून सांभाळणे भले ॥ त्या लोभात न गुंतवावे चित्त । हाच परमार्थ सत्य ॥ नसावे कशाचे ज्ञान । वाटावे सदा घ्यावे रामनाम । प्रपंची राहावे समाधान । हेच भक्ताचे मुख्य लक्षण जाण ॥ पतिव्रता साध्वी थोर थोर । त्यांचे करावे स्मरण । जे करील पुण्यवान ॥ न बोलावी पतीस दुरुत्तरे । समाधान राखोनि अंतरे । जे सज्जनांस आवडेल खरे ॥ पतीपरते न मानावे दुजे दैवत । घरात राखावे नेहमी समाधान ॥ तुमच्या पतिसार'यांची संगति । हीच भाग्याची खरी प्राप्ति ॥ त्यांच्या आज्ञेने वागावे । त्यांच्या सुखात आपले सुख पाहावे ॥ राम धरिता चित्ती । प्रपंचाची काळजी त्याचे हाती ॥ प्रपंची असावे खबरदार ॥ परी लोभात न गुंतावे अंतर । धन संग्रही राखावे । सर्वच खर्चून न टाकावे । ही प्रपंचाची रीत । सर्व जगात आहे चालत ॥ जगाची रीत लोभात असणे । हे मात्र आपणास न आवडावे ॥ देहाने करावी पतिसेवा । ध्यानी धरावा रामराया । त्याचा संसार उत्तम झाला । हाच आशीर्वाद माझा भला ॥ प्रपंचाची संगति । काळजीची उत्पत्ति । तेथे धरिता नामाची संगति । काळजीविरहित आनंद देई ॥ मुलीच्या लग्नाची काळजी करू नये । प्रयत्नाला सोडू नये । प्रयत्नाअंती परमेश्वर । हे सज्जनांचे बोल । मनी ठसवावे खोल ॥ आरंभी ज्याने स्मरला राम । त्यालाच प्रयत्नाअंती राम । हा ठेवावा विश्वास । सुखे साधावे संसारास ॥ मिष्ट भाषण वरिवरी । विष आहे अंतरी । असल्याची संगत नसावी बरी ॥ मी तुम्हास सांगतो हित । दृश्यांत न ठेवावे चित्त । राम सेवेकरता प्राण । म्हणून करणे आहे जतन ॥ मान अपमान जगतात । ते मूळ कारण झाले घातास ॥ कोणतेही काम करीत असता । राखावी मनाची शांतता । अगदी व्यवहारबुद्धीने कामे करावी सर्वथा ॥ आप्तइष्ट सखेसज्जन । यांचे राखावे समाधान । परी न व्हावे त्यांचे अधीन ॥ सर्वांशी राहावे प्रेमाने । चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे ॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे । त्यात रामाचे अधिष्ठान राखावे ॥

**७०. रामावर ठेवावा विश्वास । सुखाने करावा संसार ॥**

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

संत कोणास म्हणावे, तत्वचिंतन, तत्वज्ञान हे शब्द एकसारखे वाटतात. पण प्रत्यक्षात ते तसे नाहीत. त्या दोन्ही शब्दांत फरक आहे तो कसा ते पहा. तत्वचिंतक बुध्दीच्या जोरावर बाजू प्रमाण मानतो. तो अत्यंत हुशार असतो. शुध्द विचाराने सद्वस्तुंचें स्वरूप एकदा निश्चित झाले म्हणजे तो तिथेच थांबतो. तत्वचिंतन करण्याची त्याची भूमिका व त्या भूमिकेवर तो ठाम असतो. त्याच्या बरोबर उलट तत्वज्ञानी प्रतिभेच्या जोरावर उभा रहातो. तर्कांने विचार करून सद्ववस्तुंचे स्वरूप निश्चित झाल्यावर तेथेच न थांबता त्याच्यातील बारकावे शोधू लागतो.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १२ मार्च २०२४
adhunikkesari.com

# कलासंपन्न उद्योजिका शीतल तांबोळी

आधुनिक केसरी



बाल वयात झालेले संस्कार जीवन संपन्न करणारे असतात असं म्हणतात. याच सुंदर उदाहरण म्हणजे शितल शशांक तांबोळी... डॉ. भगवान कुलकर्णी व सौ शुभदा कुलकर्णी हे शीतलचे आई-बाबा आणि मोठा भाऊ समीर कुलकर्णी या तिघांच्या सुंदर संस्कारातून शितल घडत गेली. शितलने एम ए मराठी ..शिक्षण पूर्ण केलं. खरंतर तिचं मन कलाकाराचं होतं. चित्रकला ..हस्तकला..पाककला..याकडे बालपणापासून तिचं मन ओढ घेत होतं. शितलचा विवाह शशांक तांबोळींशी झाला. शीतल कुलकर्णीची ..सौ. शितल शशांक तांबोळीची जीवन साथीदार म्हणून तिने गृहप्रवेश केला. त्यानंतर शितलने आपली स्वप्ने शशांकला सांगितली. शशांकने देखील शितलची सर्वच स्वप्न पूर्ण करण्याचं ठरवलं. मी तुला संपूर्ण पाठबळ देईन..काळजी करू नको, असंही सांगितलं.

शशांक तांबोळीची सुरेख साथ शितलला मिळाल्या नंतर तिने कधी मागं वळून पाहिलं नाही असं म्हणावं लागेल. शितलने सुरुवातीला चित्रकलेतील डिप्लोमा.. त्यानंतर क्राफ्ट टीचर चा डिप्लोमा.. नंतर योगा टीचरचा डिप्लोमा.. पूर्ण करीत जणू हॅट्रिकच केली. शितल ही मुळात एक चांगली कलावंत होतीच.. मात्र शशांकच्या पाठबळामुळे ती खऱ्या अर्थाने एक ज्ञानसंपन्न कलावंत झाली असंच म्हणावं लागेल. आपल्या पतीच्या प्रोत्साहनाच्या बरोबरच तिच्या दोन नणंदा आरती भालकीकर आणि कीर्ती मनसबदार ..या दोघेही कलावंत होत्या मग काय ..या दोघानींही शीतलला मोठं मार्गदर्शनही केलं आणि पाठबळही दिलं. त्याचबरोबर शितलचे सासू-सासरे भास्करराव तांबोळी व मंगला तांबोळी यांनीही आपल्या सुनेला.. शितलला सदैव मदतीचा हात दिला. त्यामुळे आपण वेगळं काहीतरी कलाक्षेत्रामध्ये करावं, अशी ओढ शितलच्या मनामध्ये निर्माण झाली. शितलच्या परिवारातील साऱ्यांनीच तिला साथ दिल्यामुळे. शितलची हस्तकला.. चित्रकला.. रांगोळी कला.. पाककला ..योगसाधना ..अशा एक ना दोन अनेक कलागुणांचे अश्व चौफेर धावू लागले.



सुधीर कोर्टीकर
मो. 9765553312

शितलच्या मनामध्ये वेगवेगळ्या संकल्पना आल्या आणि आकार घेऊ लागल्या.

सुरुवातीला शीतलने धावणी मोहल्या मधील विठ्ठल मंदिरात विविध रंग रंगांच्या प्रक्रियेच्या मधून निर्माण केलेल्या 101 गणपतीच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले. त्याच्या बातम्या अनेक वृत्तपत्रात आल्या.. त्याची दखल सर्व मीडियाने घेतली .त्यामुळे शीतल मध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला. या आत्मविश्वासाच्या मधूनच शितलने श्रीकृष्णांच्या अनेक लीलांची अतिशय सुंदर पेंटिंग तयार केली. मग या पेंटिंगचं एक्झीबिशन संभाजीनगर मधील रामा इंटरनॅशनल हॉटेलच्या साकारले गेले. या प्रदर्शनाचे उद्घाटन गरवारे कंपनीचे सीईओ अनिल भालेराव आणि त्यांच्या सुविध्य पत्नी शैलजा भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनाची शीतलच्या पेंटिंगची दखल संपूर्ण मीडियाने घेतली आणि तिच्या कलागुणाची मुक्तकंठाने प्रशंसा केली गेली. शितलची कलागुण क्षेत्रातील प्रगती चौफेर सुरू असतानाच तिच्या प्रगतीला काहीसा ब्रेक लागला गेला. शितलचे पती शशांक हे गरवारे कंपनीमध्ये मोठ्या पदावर नोकरीस होते. शशांकने गरवारे कंपनीतली नोकरी सोडली आणि ते दुबईमधील एका मोठ्या पदावर नोकरी मिळाल्यामुळे त्या ठिकाणी गेले .अर्थातच शितलला देखील दुबईत जावे लागले. तरीही शितल खचली नाही.. नाऊमेद झाली नाही. त्याही परिस्थितीत शितलच्या मनात आपले कला गुणांचे भ्रमर गुंजन करीत होते. दुबई सारख्या अनोळख्या देशांमध्ये शितलने न खचता त्या ठिकाणी देखील मुला-मुलींसाठी महिलांसाठी चित्रकलेचे हस्तकलेचे क्लासेस घेण्यास सुरुवात केली. त्याला चांगला प्रतिसादही मिळाला. शीतल ही एक अभिजात कलावंत असल्यामुळे तिने दुबई सारख्या ठिकाणी एखाद्या भ्रमराप्रमाणे कलागुणाचा छंदाचा मध गोळा करण्यास सुरुवात केली. शितलने त्या ठिकाणी अरेबिक मेहंदी ..तसेच सॅंड आर्टचे प्रशिक्षण घेतले आणि त्यातूनही अनेक पेंटिंग्स तयार केली. जवळजवळ दहा वर्षाचा हा दुबईमधील कालखंड तिच्या कलांगुणांसाठी खूप कठीण गेला.





दहा वर्षाच्या कालखंडानंतर शीतल आणि शशांक पुन्हा भारतात परत आले. तेव्हा शीतलने मंगला तांबोळी अर्थात तिच्या सासूंच्या लोणचे ..मसाले.. चटण्या.. भुरके या व्यवसायामध्ये मनापासून लक्ष घातले. शितल शशांक दोघेही नसल्यामुळे मंगला तांबोळी यांचा तांबोळीगृह उद्योगाचा हा व्यवसाय खूप मंदावलेला होता. शितल परतल्यानंतर मात्र तिने मनापासून या तांबोळी गृहउद्योगाला खूप गतिमान केलं.

तांबोळी गृह उद्योगाची लोणची.. मसाले.. चटण्या.. भुरके.. यांना अप्रतिम पॅकिंगची जोड दिली. पाहता पाहता. तांबोळी गृह उद्योगानी भरारी घेतली... मराठवाडा महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात आणि भारताच्या बाहेर देखील तांबोळी गृह उद्योगाची उत्पादने ग्राहकांच्या हातात पोहोचली.. आणि तांबोळी गृह उद्योगाचा एक ब्रँड तयार झाला आकर्षक पॅकिंग.. उत्तम गुणवत्ता.. व्यवसायातील सचोटी.. यामधून तांबोळी गृह उद्योगाची उत्पादने घराघरातून लोकांच्या मनापर्यंत पोहोचली.

ज्ञानसंपन्न.. कलासंपन्न उद्योजिका म्हणून शीतलला मोठ्या मानानं असंख्य ठिकाणी व्याख्यानासाठी ..मार्गदर्शनासाठी.. विविध संस्थांनी ..बचत गटांच्या महिलांनी बोलवण्यास सुरुवात केली. बचत गटांच्या महिलांसाठी मार्गदर्शन स्पर्धांचे परीक्षक.. अनेक वृत्तपत्रांच्या कार्यक्रमाचे परीक्षक ..योग परीक्षक.. कला परीक्षक.. हस्तकला परीक्षक ..अशा ठिकाणी शीतल तांबोळीची वर्णी लागू लागली.

छत्रपती संभाजी नगरित शितल एक कलासंपन्न उद्योजिका म्हणून आज नावारूपास आलेली आहेत. त्यामुळेच शितल तांबोळीच व्यावसायिक जगताबरोबर ..कलाक्षेत्रातही नाव आदराने घेतलं जातं. शितलला राजा रवी वर्मा महाविद्यालयाच्या मध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे योग शिक्षिका म्हणून देखील तिच्या यथोचित सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य युवक क्रीडा मंडळाच्या तर्फे घेतलेल्या रांगोळी स्पर्धांमध्ये देखील शितलला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

शितलने आपल्या अनमोल कामगिरीने हस्तकला.. चित्रकला... पाककला..रांगोळी कला यामधून स्वतःचं वेगळं असं वलय निर्माण केलं. तिच्या या कर्तुत्वामुळेच तिला दैनिक लोकमतच्या स्पर्धा मधून.. एशिया बुक ऑफ रेकॉर्डच्या विविध स्पर्धा मधून ..कधी परीक्षक तर कधी व्याख्याते म्हणून सातत्याने निमंत्रित केले जात आहे .शितलच्या कलाक्षेत्रातील कार्यासाठी तिच्या दोन्ही मुलांचा शिवांश आणि शिवेंद्रचा मोठा सपोर्ट तिला नेहमीच मिळत असतो असेही शीतलने आमच्याशी बोलताना सांगितले .भविष्यात देखील पेंटिंग रांगोळ्या हस्तकला अशा विविध क्षेत्रात मोलाचे योगदान द्यायचे आहे. शिवाय यापुढे सुरेख अशी कलाक्षेत्रातील प्रदर्शने भरवायची आहेत त्याची मी आता तयारी देखील सुरू केलेली आहे असेही शीतलने बोलताना सांगितले...

केवळ एक-दोन नव्हे तर असंख्य कला गुण छंदाची जोड लाभलेल्या शितल तांबोळीने आपल्या सासू-सासऱ्यांची सेवा करीत साऱ्यांच्या मनात एक वेगळं असं स्थान निर्माण केलं.. आपल्या सासूबाईंनी सुरू केलेल्या तांबोळी गृह उद्योग.. आपल्या कलासंपन्नते मधून आज मोठ्या उंचीवर तिने नेऊन ठेवलेला आहे. वास्तविक शितलचे पती नोकरीच्या निमित्ताने काही वर्षापासून सिलव्हासा गुजरात येथे आहेत. असे असतानाही आपल्या सासऱ्यांची देखभाल करीत.. सासूबाईंचा लोणचे मसाले यांचा व्यवसाय प्रगतीपथावर तिने नेऊन ठेवलेला आहे. हे करीत असतानाच कधी परीक्षक.. कधी व्याख्यानाच्या माध्यमातून शितल बाहेरील कार्यक्षेत्र तितक्याच हिमतेने सांभाळत आहे. हे करीत असतानाच विविध प्रदर्शन देखील ती भरवत आहे... शितलच्या ओंजळीत परमेश्वरांनी घेशील तू किती दोन कराने म्हणत भरभरून खूप कला गुण दिलेले आहेत .शितलकडे पाहिल्यावर असं वाटतं ..

". एक समजदार बुद्धिमान पत्नी.. आपल्या सासू-सासऱ्यांची मनापासून सेवा करणारी सून.. आपल्या नणंदांची एक सुंदर मैत्रीण ..विलक्षण प्रेम करणारी बहीण.. त्याचबरोबर एक प्रेमळ भावनाशील मुलगी.. प्रत्येक संकटावर हसतमुखपणे सामोरी जाणारी जिद्द चिकाटीने आपल्या गृह उद्योग विकसित करणारी खंबीर गृहिणी ..शेवटी एक संस्कारक्षम प्रेमळ दोन मुलांची आई.. अशा सर्व आघाड्यावर हसतमुखपणे सामोरं जाणाऱ्या शितलकडे पाहून इतकंच म्हणावसं वाटतं...

*जला विना मीन कसे*
*सुरा विना सुर मंदिर कसे*
*शितल विना तांबोळी परिवाराचे*
*जीवन कसे...*
*जीवन कसे...*













# बांबूपासून ज्वेलरी : प्रशिक्षणातून महिलांना मिळाले उपजीविकेचे साधन



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** झपाट्याने विस्तार होत असलेल्या बांबू क्षेत्रात प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना उपजीविकेचे साधन प्राप्त व्हावे, या उद्देशाने चिचपल्ली येथील बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात (बीआरटीसी) आठ दिवसीय ज्वेलरी प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी महिलांनी बांबू पासून ज्वेलरी तयार करून आपल्यातील सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले.

ज्वेलरी प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप नुकताच करण्यात आला. 20 महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. बाजारपेठेत असलेल्या विविध धातूच्या ज्वेलरी आपल्याला नेहमीच दिसतात, परंतु बांबू वस्तुंची वाढती मागणी लक्षात घेता या प्रशिक्षणात महिलांना विविध प्रकारची बांबू ज्वेलरी तयार करण्याचा लाभ आवश्यक साधनसामुग्री सह देण्यात आला. प्रशिक्षणाकरिता संपूर्ण बांबू केंद्र मेळघाट येथून विजय काकडे, कृष्णा मासादे या प्रशिक्षकांना बोलविण्यात आले होते. या प्रसंगी महिलांनी प्रशिक्षणातून विविध डिझाईन मध्ये बांबूपासून ज्वेलरी तयार केली.

यावेळी जिल्ह्यातील विविध बांबू वस्तू उत्पादक व खरेदीदार यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवून महिलांनी तयार केलेल्या ज्वेलरीचे कौतुक केले आणि खरेदीसुध्दा केले. अश्या प्रशिक्षणातून ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांचा आर्थिक विकास होईल, असा विश्वास केंद्राचे संचालक अशोक खडसे यांनी व्यक्त केला. यावेळी समाजकार्य महाविद्यालयाचे डॉ. सुभाष गिरडे, बीआरटीसी चे पर्यवेक्षक योगिता साठवणे, वनपाल एस. एस. लाटकर आदी उपस्थित होते.

# अरुण गोयल यांचा राजीनामा

आधुनिक केसरी

आगामी लोकसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते. त्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून तयारी केली जात आहे, असे असतानाच निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी अचानकपणे आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या या निर्णयाने सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे. अरुण गोयल यांचा कार्यकाळ हा ५ डिसेंबर २०२७ पर्यंत होता. विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार निवृत्त झाल्यानंतर अरुण गोयल हेच मुख्य निवडणूक आयुक्त होणार होते. मात्र त्यांनी आपला कार्यकाळ संपण्याआधीच राजीनामा दिला. या राजीनाम्यानंतर आता पुढे काय होणार? नव्या निवडणूक आयुक्तांची नेमणूक कधी आणि कशाप्रकारे केली जाणार? असे विचारले जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अरुण गोयल यांचा राजीनामा स्वीकारलेला आहे. त्यानंतर ९ मार्चपासून निवडणूक आयुक्त हे पद रिक्त आहे. अरुण गोयल यांनी आपल्या पदाचा राजीनामा नेमका का दिला? याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. मात्र माध्यमांतील वेगवेगळ्या वृत्तांनुसार अरुण गोयल आणि त्यांच्या सहकाऱ्यांत वेगवेगळ्या मुद्द्यांवरून मतभेद होते. अरुण गोयल यांच्या राजीनाम्याचे हेच कारण असू शकते, असे सांगितले जात आहे. दरम्यान, मी वैयक्तिक कारणांमुळे राजीनामा देत आहे, असे गोयल यांनी आपल्या राजीनामापत्रात सांगितले आहे. अरूण गोयल हे १९८५ च्या बॅचचे आयएस अधिकारी आहेत. १८ नोव्हेंबर २०२२ ला त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. त्यानंतर लगेचच म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२२ ला निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. त्यांची नियुक्ती वादात अडकली होती. या नियुक्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही देण्यात आले होते. अरूण गोयल यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे तर मग त्यांना इतक्या तातडीने निवडणूक आयुक्तपद का दिले गेले? असे सर्वोच्च न्यायालयाने सरकारला विचारले होते. देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त यांच्या नेमणुकीसाठी काही नियम आहेत. हे सर्व नियम नवीन मुख्य निवडणूक आयुक्त, इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवाशर्ती आणि कार्यालयीन अटी) कायदा २०२३ मध्ये नमूद आहेत. गेल्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यात हा कायदा मंजूर करण्यात आला होता. तर २ जानेवारी रोजी हा कायदा प्रत्यक्ष लागू झाला होता. या कायद्याअंतर्गत आता केंद्र सरकार लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक करू शकते. निवडणूक आयुक्तांची नेमणूक ही दोन समित्यांच्या माध्यामातून केली जाईल. यातील पहिली समिती ही शोधसमिती आहे. या समितीत एकूण तीन सदस्य असतील. या समितीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय कायदामंत्री असतील. तर अन्य दोन सदस्य हे सचिव स्तरावरचे शासकीय अधिकारी असतील. दुसऱ्या समितीतही तीन सदस्य असतील. ही समिती निवड समिती म्हणून ओळखली जाते. या समितीच्या अध्यक्षपदी देशाचे पंतप्रधान असतील. यामध्ये एक सदस्य हा पंतप्रधानांनी शिफारस केलेला एक केंद्रीय मंत्री असेल तर एक सदस्य हा लोकसभेचा विरोधी पक्षनेता असेल.

# सुसंस्कृत राजकारणी मा. यशवंतराव चव्हाण

आधुनिक केसरी



डॉ. प्रकाश खेत्री,
मुंबई, ७८४३०९२२४४

**सांगली जिल्ह्यात कृष्णाकाठी सह्याद्रीच्या कुशीत कऱ्हाड तालुक्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावात एका गरीब कुटुंबात विठाबाई आणि बळवंतराव यांच्या उदरी १२ मार्च,१९१३ मध्ये यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. त्यांनी शालेय जीवनातच स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला, विद्यार्थिदशेत वयाच्या १७ व्या वर्षी तिरंगा फडकवल्याबद्दल १८ महिने तुरुंगवास भोगला, कष्टातून शिक्षण घेतले, पुढे देश स्वतंत्र झाल्यानंतर तेव्हाच्या मुंबई प्रांतिक मंत्रिमंडळात संसदीय सचिव, नंतर द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान, विरोधी पक्षनेते तसेच केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर साहेबांनी काम केले.**

महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा यशवंतरावांनी गतिमान केला. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांच्या विचारांचे ते प्रवक्ते होते. या विचारांचा वारसा जपत, विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्य व कर्तुत्वाचा ठसा उमटवला. सहकार जाळे, लोकशाहीचे विकेंद्रीकरण, कृषी-औद्योगिक समाज व्यवस्थेची उभारणी या त्रिसूत्रीवर साहेबांनी भावी महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल निश्चित केली. त्यांच्या ४० वर्षांच्या कारकिर्दीतील प्रत्येक निर्णय राज्याच्या प्रगतीला गती आणि सर्वसामान्य माणसाला बळ देणारा होता. राज्यातील जनतेचं कल्याण हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. साहेबाच्या व्यक्तिमत्वाचे खास पैलू म्हणजे, ते साहित्यिक, मित्र, सामान्य माणूस आणि शालेय विद्यार्थी यांनी पाठवलेल्या पत्रांना आवर्जून उत्तर देत, प्रेरणा व आशीर्वाद देत. मार्गदर्शन करत, लायक कार्यकर्त्यांना संधी देत, विरोधकाच्या मताचा आदर करत, आपल्या सहकाऱ्यांच्या कामात हस्तक्षेप करत नसत, त्यांना आपले विचार निर्भयपणे मांडण्याची मुभा देत, संघर्षापेक्षा सामंजस्याकडे त्यांचा अधिक कल होता. कमीत कमी राजकारण व अधिकाधिक समाजकारण-अर्थकारण या मूल्यावर आधारित वाटचाल त्यांना अभिप्रेत होती. सर्वांना बरोबर घेऊन बेरजेचे राजकारण करण्याची त्यांची हतोटी होती. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांमध्ये आणि नेत्यांमध्ये वैचारिक मतभिन्नता असली तरी वैयक्तिक कटुता किंवा वैर कधीच येऊ दिले नाही, विरोधी पक्षातील नेत्यांशी वैयक्तिक मैत्री असणं आणि राज्याच्या विकासासाठी या सर्वांनी एकत्र येणं, असं सकारात्मक वातावरण केवळ महाराष्ट्रातच दिसू शकतं. ही सर्व साहेबांच्या संस्कारांची आणि विचारांची देणगी आहे. १९५७ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या निवडणुकीत भाऊसाहेब हिरे विरुद्ध यशवंतराव चव्हाण अशी लढत झाली, यामध्ये साहेब विजयी झाले. याच काळातच भाऊसाहेब हिरे यांच्या कन्येचा विवाहसमारंभ मालेगावात होता. या समारंभाचे आग्रहाचे आमंत्रण हिरे यांनी दिले, या समारंभास साहेब येणार नाहीत अशी जोरात चर्चा होती, कारण भाऊसाहेब विरोधात उभे होते, परंतू मा. वि. वा. नेने आपल्या 'मी पाहिलेले यशवंतराव' पुस्तकात आठवणीत सांगतात, "तुम्ही आलात म्हणायचे समारंभाला" यशवंतराव म्हणाले, "का ? असे का म्हणतोस ?" मी म्हटले, तुम्ही या समारंभास येणार नाही असा जोरात प्रचार या बाजूस चालला होता म्हणून म्हटले. यशवंतराव त्यावर म्हणाले, "हे बघ बापू, माझे व भाऊसाहेबांचे मतभेद आहेत हे खरे. पण ते राजकीय पातळीवर आहेत. वैयक्तिक त्यांचे व माझे भांडण थोडेच आहे ? विवाहसमारंभ हा खासगी समारंभ आहे. त्याला हजर राहण्याआड मी राजकीय मतभेद का आणू ? ही माझी नीती नाही. वागण्याची पद्धत नाही." राजकीय मतभेद वैयक्तिक संबंधाआड येऊ देऊ नयेत, हा पायंडा सर्वांनीच पाळला तर किती चांगले होईल. आजच्या सर्व राजकारण्यांनी साहेबांच्या या कृतीतून बोध घेण्यासारखे आहे. विशेषतः गावपातळीवरील नेते आणि कार्यकर्ते यांनी आपसात राजकारणापायी वैर बाळगणे किती गैर आहे, हे या उदाहरणावरून लक्षात घ्यावे. यशवंतराव चव्हाण साहेबांचे राजकारण, त्यांचे भाषण, लेखन, वर्तन हे नितीमान राजकारणाचा एक आदर्श वस्तुपाठ होते. महाबळेश्वर येथील काँग्रेस पक्षाच्या शिबिरात त्यांनी नेत्यांना व कार्यकर्त्यांना एक मोलाचा सल्ला दिला होता. "निवडणूक असो व नसो आपल्या पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी जाहीर सभा कार्यक्रमांमध्ये काय बोलावे याचा तर अभ्यास करावाच पण काय बोलू नये याचे पथ्यही पाळले पाहिजे" ते कधीही व्यक्तिगत आयुष्यात व सार्वजनिक व्यासपीठावर संसदीय मर्यादा व नीतिमत्ता सोडून बोलले नाहीत. किंवा विरोधकांवर असंसदीय भाषेत, खालच्या पातळीवर जाऊन टीका केली नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या समितीच्या नेत्याकडून टिका होत असे. या टिकेमध्ये प्रख्यात साहित्यिक, दै. मराठाचे संपादक प्र. के. अत्रे हे आघाडीवर होते. एकदा एका पत्रकाराने मराठा वृत्तपत्रातील टिकेसंदर्भात यशवंतरावांना प्रश्न विचारला तेव्हा साहेबांनी अत्यंत नम्रपणे उत्तर दिले की, "अत्रेंची दर्जेदार साहित्यिक म्हणून माझ्या मनात असलेली प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून मी मराठा वृत्तपत्र वाचतच नाही." महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर प्र. के. अत्रे यांनी 'निपुत्रिक यशवंतरावांच्या हाती महाराष्ट्राची धुरा' अशा मथळ्याचा यशवंतरावांवर टिका करणारा एक लेख लिहिला. या लेखाबद्दल ऐकल्यानंतर दुसऱ्या दिवशी यशवंतराव चव्हाण यांनी अत्रेंना फोन केला. यशवंतराव म्हणाले, "अत्रे साहेब, तुम्ही मला निपुत्रिक म्हणता पण अहो मी निपुत्रिक नाही चले जाव चळवळीवेळी मला अटक करण्यासाठी पोलिसांनी माझ्या घरावर धाड टाकली होती. त्यावेळी माझी पत्नी वेणू गरोदर होती. इंग्रजांच्या हाताला मी लागलो नाही. त्याचा राग त्यांनी माझ्या पत्नीवर म्हणजेच वेणूवर काढला. त्यांनी वेणूच्या पोटावर काठीने मारलं. या सगळ्यात तिच्या पोटात असलेला गर्भ पडला. तसंच गर्भशयाला देखील दुखापत झाली आणि त्याचमुळे पुन्हा मला मुल होण्यात अडचण आली. यशवंतराव चव्हाण यांचं फोनवरील बोलणं ऐकून आचार्य अत्रें यांना आपली चूक लक्षात आली. त्यानंतर क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी यशवंतराव चव्हाणांची माफी मागितली. आणि यशवंतरावांच्या घरी जाऊन वेणूताईसमोर अत्रेंनी पश्चातापही व्यक्त केला. पुढे जाहीरसभेतही त्यांनी यशवंतरावांची माफी मागितली. अशी वैयक्तिक टीका करूनही साहेबांनी आचार्य अत्र्यांच्या लिखाण आणि विचार स्वातंत्र्यावर बंधने लादली नाहीत की त्यांच्या वृत्तपत्राला कोणत्याही अडचणी निर्माण केल्या नाहीत, संपादक व लेखकाना वैचारिक आणि लेखन स्वातंत्र्य असेल तरच ते मुक्तपणे लिहू शकतील, तेव्हाच लोकशाही प्रगल्भ होईल, असे ते मानत. यावरून साहेबांची वैचारिक प्रगल्भता, उदारता आणि सुसंस्कृतपणा लक्षात येतो. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर 'हे राज्य मराठी माणसांचे असेल की मराठा माणसांचे ?' असा परखड सवाल ग.त्र्यं. माडखोलकरांनी यशवंतराव चव्हाणांना विचारला होता. यशवंतरावांनी देखील तेवढ्याच आत्मविश्वासाने आणि वैचारिक प्रग्लभतेतून 'हे राज्य मराठी माणसांचे होईल' असे उत्तर दिले होते. या वैचारिक बैठकीला अनुसरून त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या विकासाची स्वप्ने उराशी बाळगली व प्रत्येक्षात आणली. महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांबद्दल ज्यांचं उत्पन्न ९०० रू. च्या आत आहे, त्यांच्या मुलांना विद्यापीठीय शिक्षण मोफत केलं जावं असा निर्णय घेतला. तेव्हा पुण्याला एका शिक्षणतज्ज्ञांनी प्रश्न विचारला. हे शिक्षण मोफत केले तर संकट निर्माण होईल याची जाणीव आहे का ? तेव्हा शिक्षणतज्ज्ञ म्हणाले, शिक्षित आणि प्रशिक्षित लोकांचं सैन्य निर्माण होईल आणि ते उद्या बंड करून उठतील ..! तेव्हा साहेबांनी उत्तर देतांना त्यांना सांगितलं की, "मी जरूर याचा विचार केलाय. माझं असं मत आहे की, ही अशिक्षित सेना राहण्यापेक्षा शिक्षित सेना जर झाली आणि स्वतःचे आणि देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी बंड केलं तर माझ्या निर्णय व कामाचा हेतू सफल झाला असं मी मानेन. हा निर्णय लागू झाला, या सवलतीला इ.बी.सी. सवलत म्हणतात. ज्ञानाची लोकशाही निर्माण करण्याचे काम या एका निर्णयामुळे महाराष्ट्रात झाले. बंदुकीतून झालेल्या क्रांती पेक्षा शिक्षणातून झालेली क्रांती अधिक परिणामकारक व शाश्वत असते. या निर्णयामुळे सामान्य शेतकऱ्याचा मुलगा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आला. याबरोबरच साहेबांनी शिक्षण, सहकारी आणि सेवाभावी आदी संस्था उभारण्यातही सिंहाचा वाटा आणि मोठे पाठबळ दिले. संस्था कोणत्या एका व्यक्ती वा पक्षाच्या नसतात, संस्थाप्रमुख हे केवळ विश्वस्थ असतात, त्यांनी स्वतःला मालक समजू नये, संस्था या समाज आणि जनतेच्या असतात, हे मानत यशवंतरावांनी महाराष्ट्रभर विविध संस्थाना मदत केली, सर्व संस्थाना आपल्या घरच्या बागेतील रोपां व झाडाप्रमाणे सांभाळले, जोपासले. तसेच त्यांची अंतःकरणापासून पाठराखण केली. महाराष्ट्रातील आजच्या राजकारणी नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यशवंतरावजींकडून एवढी बाब जर शिकली वा आत्मसात केली तर महाराष्ट्राचे लोकजीवन समृध्द होत ते फुलायला वेळ लागणार नाही. आज मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या मूल्याधिष्ठित, सुसंस्कृत व गुणसंपन्न राजकारणाची प्रचंड उपेक्षा होत आहे. आजचे काही राजकारणी एकमेकांच्या नावाने रोजच शिमगा करत आहेत. दिवसेंदिवस महाराष्ट्राच्या राजकारणातील भाषेचा स्तर खालावतांना दिसतो आहे. विचारांच्या ऐवजी विखार, विरोधाच्या ऐवजी विद्वेष, मतभेदाच्या ऐवजी मनभेद, स्पर्धेच्या ऐवजी शत्रुत्व, सहकाराच्या ऐवजी 'स्व'हकार, विश्वासाच्या ऐवजी विश्वासघात आणि काही चालक मालक बनत आहेत. या सर्व बाबी आता महाराष्ट्राच्या राजकारणात पहावयास मिळत आहेत, रुजू लागल्या आहेत. प्रगत, पुरोगामी आणि सुसंकृत महाराष्ट्रासाठी हे सर्व चिंताजनक आहे, या परिस्थितीवर अगदी सोप्या भाषेत भाष्य करताना मा. मधुकर भावे आपल्या 'यशवंतराव ते विलासराव' या पुस्तकात लिहितात, ''यशवंतराव पाच वर्षांचे असताना पंढरपूरला गेले होते. त्यांच्या आईने यशवंतरावांच्या मामाला सांगितले होते की, यशवंताचे बोट घट्ट पकड, नसता तो गर्दीत भरकटेल. हणुमंत मामाने पाच वर्षांच्या यशवंतरावांचे बोट अगदी घट्ट पकडून ठेवले. त्यामुळे यशवंतराव गर्दीत भरकटले नाहीत. महाराष्ट्राने मात्र यशवंतरावांचे पकडलेले बोट सोडले, म्हणून महाराष्ट्र आज काहीसा भरकटलेला दिसतो.'' तेव्हा यशवंतराव चव्हाण साहेबांचे वैचारिक बोट आपल्या हातून सुटनार नाही... ! याची काळजी आणि विचार साहेबांच्या जयंती दिवशी आज महाराष्ट्रातील नेते, कार्यकर्ते आणि सामान्य जनता यांनी करायला हवा...! हेच मा. यशवंतराव चव्हाण साहेबांना खरे अभिवादन ठरेल...!

# सह्याद्रीचा सिंह : यशवंतरावजी चव्हाण साहेब

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**संस्कृती महाराष्ट्र निर्माण व्हावं यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे नेतृत्व म्हणून आजही आपण यशवंतराव चव्हाण साहेब यांचं नाव काढतो. हिमालयाची उंची सहजासहजी गाठता येत नाही त्यासाठी संस्कृतपणा सुद्धा अभाळ उंचीचा असला पाहिजे आणि तो चव्हाण साहेब यांच्या मध्ये ओतप्रोत भरलेले होता म्हणून ते सह्याद्री चे सिंह ठरले.महाराष्ट्र राज्याच्या पावन भूमीत अष्टपैलू सुसंस्कृत नेतृत्व होऊन गेलं त्यांच्या कार्याची ओळख त्यांच्या नावाने आजही अमर आहे.संयुक्त महाराष्ट्राचा अमृतकलश दिल्लीहून आणणारे सह्याद्रीचे सिंह, उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी नेतृत्व, अभ्यासू व्यक्तीमत्त्व म्हणून ज्यांची ख्याती आहे.**

तसेच ज्यांच्या नावाने ऋणानुबंध, कृष्णाकाठ, युगांतर, सह्याद्रीचे वारे एवढ्या प्रचंड मोठ्या प्रमाणात साहित्य संपदा निर्माण करणारे साहित्यीक, लेखक, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, देशाचे उपपंतप्रधान, केंद्रीय गृह तथा संरक्षणमंत्री इत्यादी महत्वपुर्ण पदावर आपले गुण कौशल्य व नेतृत्वातील कौशल्याने कार्य करण्याची संधी मिळली असे महान सह्याद्रीच्या उंचीचे नेतृत्व यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म कृष्णा व कोयना नद्यांच्या पावनभूमीत असणाऱ्या देवराष्ट्रे जि.सातारा येथे दि.12 मार्च 1913 रोजी झाला.यशवंतराव हे लहानपणपासूनच गरीबी परिस्थितीशी झगडत व संघर्षकरत असताना वेगवेगळ्या अडचणी, समस्या वर मार्ग काढत प्रचंड कष्ट, मेहनतीने घडलेलं नेतृत्व म्हणजे अगदी शुन्यातून विश्व निर्माण केले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वडिल बळवंतराव यांच्या निधनानंतर आईने व भावाने यशवंतराव यांचे पालनपोषण करुन शिक्षण पुर्ण केले. बालवयातच संगीत, भजन,किर्तन इत्यादी बाबींचे फार आवड होती.प्राथमिक शिक्षण कऱ्हाड येथील तर उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले.यशवंतराव चव्हाण हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभागी होते.1930 मध्ये असहकार चळवळीत राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या नेतृत्वात सहभागी झाल्याने त्यांना दंड देखील ठोठावण्यात आला होता. 26 जानेवारी 1932 रोजी सातार्‍यात भारतीय ध्वज फडकावल्याबद्दल त्यांना 18 महिन्याच्या कारावासाची शिक्षा करण्यात झाली होती. 1942 च्या मुंबई येथील अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात ते सहभागी असतांना त्या ठिकाणी 'भारत छोडो' चा नारा देण्यात आला होता त्याचा परिणाम म्हणून त्यांना अटक झाली आणि 1944 मध्ये ते तुरुंगातून सुटले.भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे खुप मोठे योगदान आहे.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्राच्या कृषी, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, सहकार,उद्योग, साहित्य, पंचायतराज व्यवस्था या धोरणामध्ये यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची दुरदृष्टी आपल्याला आजही पहावयास मिळते.एक सुसंस्कृत अध्यात्मिक वृत्तीचा राजकारणी कसा असतो याचे दर्शनच त्यांच्या रुपाने आपणास पहावयास मिळते. राजकीय विरोध हा विचारांचा असतो व्यक्तीचा नाही असा आदर्श महाराष्ट्राला घालून देणारे सुसंस्कृत राजकारणी म्हणून महाराष्ट्राच्या सामाजिक जिवनात यशवंतराव चव्हाण यांची ओळख आहे.अगदी साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असणारा हा सह्याद्रीचा सिंह आपली नाळ अगदी महाराष्ट्राच्या ग्रामीण जिवनाला जोडून होते.याची प्रचिती तर त्यांच्या कार्यातून येते. महाराष्ट्र राज्याच्या पावन भुमितील ब्रह्मचारी संत व भगवत धर्माचे प्रचारक प्रसारक प्रखर राष्ट्र भक्त थोर समाजसुधारक महान प्रबोधनकार युगप्रवर्तक जगद्विख्यात तत्वज्ञानी योग विद्या वेद शास्त्र पारागंत नव निधी अष्ट सिद्धी प्राप्त ब्रह्मचारी संत भगवान बाबा ज्यांच्या सुसंकृत महाराष्ट्र घडविण्यात खुप मोठ योगदान आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आध्यत्मिक ज्ञान मार्गाने विचारवंतांची फौज निर्माण करत अनमोल योगदान देणारे संत भगवानबाबा यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात किर्तनांच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतीक प्रबोधन केले व भक्तीमार्ग, कर्ममार्ग, ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी संगम साधत असताना ज्ञान उपदेश देऊन लाखो लोकांना भक्ती मार्गावर आणलं. भटक्या,फाटक्या वंचित बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचा शिक्षणाचा महायज्ञ आरंभ केला भव्य असं ज्ञान पीठ धैम्य गड निर्माण केला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लोकसभेची उमेदवारी स्थानिकालाच द्या

## महाविकास आघाडीतील जिल्हा पक्षप्रमुखांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** देशामध्ये महाविकास आघाडीची सत्ता स्थापन करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर संघटन बांधणी आणि प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील सर्व महाविकास आघाडीच्या पक्षांच्या जिल्हा पक्षप्रमुखांनी बैठक घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून स्थानिक व्यक्तीलाच तिकीट देण्याबाबत ठराव घेण्यात आला. तसा ठराव केंद्रीय कमिटीकडे पाठविण्यात येणार आहे. यावेळी महाविकास आघाडीमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी आणि संभाजी ब्रिगेड आदि पक्ष पदाधिकारी सहभागी झाले होते.
मागील लोकसभा निवडणुकीमध्ये सर्वत्र भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून आले असताना महाराष्ट्रातील केवळ चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात बाळूभाऊ धानोरकर यांच्या रूपाने काँग्रेसने विजय मिळविला. मागील काळात त्यांचे दुखद निधन झाले. त्यांनी केलेला संकल्प आणि त्यांचा विकासाचा ध्यास पुढे नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. या भागामध्ये त्यांच्या प्रति अत्यंत चांगली प्रतिमा आणि उत्साही लाट आहे. आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये स्थानिक व्यक्तीला उमेदवारी दिल्यास महाविकास आघाडीला मोठा लाभ होऊ शकतो.
बैठकीला शहर (जिल्हा )काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी, ग्रामीण जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दीपक जयस्वाल, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे गटा)चे जिल्हाध्यक्ष संदीप गिऱ्हे, आम आदमी पार्टीचे वरिष्ठ नेता सुनील मुसळे, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष सोयल शेख, संभाजी बिग्रेडचे शहर अध्यक्ष विनोद थेरे उपस्थित होते.

# हक्काच्या पाण्यासाठी काँग्रेसचा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** दुष्काळी स्थिती असल्याने सांगलीला हक्काचे आणि नियमित पाणी मिळावे या मागणीसाठी सोमवारी काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. माजी राज्यमंत्री आमदार डॉ.विश्वजित कदम यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चामध्ये पक्षाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष विक्रमसिंह सावंत, शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील, विशाल पाटील, जयश्री पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.
जिल्ह्यातील काही तालुययाना हक्काचे पाणी मिळण्यासाठी आमदार डॉ. कदम यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने रस्त्यावर उतरून आंदोलन केले. या मोर्चाच्या माध्यमातून म्हैसाळ, आरफळ, टेंभू व ताकारी पाणी योजनांचे उन्हाळी आवर्तन सुरू करुन त्यात सातत्य ठेवावे. चालू लोकसंख्या गृहीत धरून जिल्ह्यात दुष्काळी भागात मुबलक पाणी पुरवठा आवश्यक तेवढ्या टँकरद्वारे करावा. ढाणेवाडीची पाणी पुरवठा योजना व शेतीसाठी पाणी पुरवठा करावा. पलूस तालुययात कृष्णा कालव्याचे आवर्तन सुरू करणे व आरफळ योजनेतून तात्काळ पाणी मिळावे तसेच जत, आटपाडी, खानापूर, कवठेमहांकाळ व जेथे चारा टंचाई निर्माण झाली आहे अशा ठिकाणी जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात.

# जि. प. बोरसरचे विद्यार्थी राज्यातून द्वितीय

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नुकत्याच पार पडलेल्या स्वजीवी महाराष्ट्र उद्योजकता माइंडसेट राज्यस्तरीय स्पर्धेत यशस्वी झालेल्या बोरसरच्या जिल्हा परिषद च्या विद्यार्थ्यांचा पुण्यातील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक पुनरावृत्ती प्रशिक्षण केंद्रात सत्कार करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे तसेच शालेय शिक्षण विभाग आणि एम पॉवर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच स्वजीवी महाराष्ट्र उद्योजकता माइंडसेट राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये वैजापूर तालुक्यातील खंडाळा केंद्रातर्गत येणाऱ्या बोरसर येथील आदर्श जिल्हा परिषद शाळेतील तेजस अण्णासाहेब कदम (इयत्ता आठवी) तसेच सुशांत सुहास पठारे (इयत्ता नववी) यांनी चमकदार कामगिरी केली यासाठी त्यांना शिक्षक पी.बी.पांढरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना स्पर्धेत द्वितीय क्रमांक देऊन गौरविण्यात आले.उल्लेखनीय म्हणजे शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांना तांत्रिक व उद्योजकता प्रशिक्षण देण्यासाठी स्वजीवी उपक्रमांतर्गत, राज्यातील आदर्श शाळेच्या इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची मानसिकता वाढावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.त्यांच्या या यशाबद्दल वैजापूर चे आजी माजी गटशिक्षणाधिकारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा समिती अध्यक्ष, सदस्य व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.





# प्रदेश उपाध्यक्षपदी टीकाखान पठाण

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील रहिवासी असलेले मराठवाडा भूमिपुत्र शेर मोहम्मद टीका खान पठाण यांची वंदनीय हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व पक्षप्रमुख एकनाथ रावजी शिंदे साहेबांच्या आशीर्वादाने व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने मुख्यमंत्री शिंदे गट शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेश उपाध्यक्षपदी शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या हस्ते निवड करण्यात आली असून मुंबई येथे सर्वसामान्य ग्रामीण नागरिकांसाठी कार्यालय देखील सुरू करण्यात आले असल्याची माहिती टीका खान यांनी दिली आहे.
टीका खान यांनी जिंतूर नगर परिषदेत चार वेळा नगरसेवक पद व सभापती पद भूषविले असून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आल्याने या निवडीचे सर्व स्त्रातून अभिनंदन होत असून या निवडीचे स्वागत हफीज चाऊस माजी उपमहापोर सय्यद समी माजुलाला, आसिफ खान,हसिफ खान,सौरभ ठाकूर,जब्बार खान,मीनहाज जमीनदार सलीम इनामदार राजा वैष्णवी, मोहसीन खान पठाण, बाबा खान पठाण,मुन्ना पैलवान, न्याजुलाला, सिराजखान पठाण, याहीयाभाई,फिरोज भाई मिस्तरी, वैजनाथ पुणेकर, गब्बर घनसावद, माबूदभाई जागीरदार बामणीकर, मुजाहिद पठाण, मुन्ना सर, तांबोळी यांच्यासह अनेक मान्यवरांनी केली आहे.

# देशव्यापी योजनेचा प्रधानमंत्री मोदीजींच्या हस्ते शुभारंभ

## नागपुरात नितीनजी गडकरी तर चंद्रपूर येथे हंसराज अहीर प्रमुख अतिथी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीजी यांनी देशाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या



अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग (ओबीसी) व सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरीता शिक्षणाच्या प्रभावी सुविधा, शिष्यवृत्ती तसेच सिमांत वर्गाचे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सशक्तीकरण व अल्प व्याजदरात कर्जाद्वारे आर्थिक सहाय्यता आदी प्रयोजनार्थ समाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या माध्यमातून राष्ट्रव्यापी स्तरावर राबविण्यात येत असलेल्या पीएम-सुरज (प्रधानमंत्री-सामाजिक उत्थान व रोजगार आधारीत जनकल्याण) या महत्वाकांक्षी योजनेत चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला असून या योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमास सन्माननिय अतिथी म्हणून नागपूर येथे केंद्रीय रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी तर चंद्रपूर येथे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.
दि. १३ मार्च २०२४ रोजी सायं. ०४ वा आयोजित PM-SURAJ या देशव्यापी पोर्टल शुभारंभाचा कार्यक्रम मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या शुभहस्ते होत आहे. देशभरातील ५२५ जिल्ह्यात ही सामाजिक सशक्तीकरण योजना राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्यातील ९ जिल्ह्यांचा या योजनेत प्रारंभिक स्तरावर समावेश करण्यात आले असून या जिल्ह्यांसाठी प्रमुख अतिथी म्हणुन केंद्रीय कॅबिनेट मंत्री व राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. मुंबईकरीता केंद्रीय मंत्री पियुष गोयल, नागपूर जिल्हा-केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, सिंधुदूर्ग-केंद्रीय मंत्री नारायण राणे, नाशीक केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, धुळे-केंद्रीय राजमंत्री भागवत कराड, सोलापूर-केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, अहमदनगर-केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, हिंगोली- केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचा समावेश आहे.

# सोयगाव येथे वंचित बहुजन आघाडीची नियोजन बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रध्देय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये, प्रदेश अध्यक्षा रेखाताई ठाकूर, तसेच प्रदेश महासचिव अरुंधतीताई सिरसाट, युवा जी.अध्यक्ष सतीशभाऊ गायकवाड, कामगार आघाडीचे जि.अध्यक्ष के.के.जगताप,तालुका अध्यक्ष मनोहर जगताप यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हा अध्यक्ष प्रभाकर बकले मामा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दि.८/३/२४ शुक्रवार रोजी फर्दीपुर येथील शासकीय विश्रामगृहात निवडणूक नियोजन बैठक मोठ्या उत्साहात पार पडली, या बैठकीला वंचित बहुजन माथाडी कामगार आघाडीचे जिल्हा अध्यक्ष के. के. जगताप, जिल्हा उपाध्यक्ष रामदास वाघमारे, उपाध्यक्ष जावेद पटेल प्रसिद्धी प्रमुख महेंद्र गाडवे, संपर्क प्रमुख सुरेश मगरे, सचिन शिंदे,सचिव मुजाभाऊ तुपसमुद्रे, जिल्हा सदस्य शिवराम जाधव, तालुका युवक आघाडीचे अध्यक्ष विशाल संसारे, उपाध्यक्ष गणेश सोनावणे, महासचिव आनंद भाऊ सुरवाडे,महासचिव विनोद कोते, दिलीप सुरडकर,शेख जावेद शेख भिकन,मनोज म्हस्के, रमेश काशीकर,जितू मगरे,अशोक सावळे, भगवान जाधव, सचिव योगेश जाधव, उपाध्यक्ष जुगराज राठोड, भारिप बहुजन महासंघाचे माजी तालुका सचिव रविंद्र गरुड साहेब, सचिन शिंदे, तसेच पंचक्रोशीतील कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांतून पक्ष रणनीती विषयी जो संभ्रम निर्माण केला जातो त्याला पक्ष कार्यकत्यीनी कस सामोरे गेले पाहिजे याबद्दलचे रामदास वाघमारे मार्गदर्शन , सुरेश मगरे यांनी कैले, यांनी मार्गदर्शन केले.तसेच रामदास वाघमारे, सुरेश मगरे यांनी सुद्धा पक्षाचे ध्येय धोरणे यावर सविस्तर माहिती दिली.तालुका सचिव रविंद्र गरुड साहेब, आनंदा सुरवाडे,सचिन शिंदे, तसेच पंचक्रोशीतील कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांतून पक्ष रणनीती विषयी जो संभ्रम निर्माण केला जातो त्याला पक्ष कार्यकत्यीनी कस सामोरे गेले पाहिजे याबद्दलचे मार्गदर्शन आनंद भाऊ सुरवाडे यांनी कैले, तसेच रामदास वाघमारे, सुरेश मगरे यांनी सुद्धा पक्षाचे ध्येय धोरणे यावर सविस्तर माहिती दिली. अशी माहिती वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मनोहर जगताप सावळदबारा यांनी बोलताना दिली.



# ‘त्या’ जमिनीचे संपादन व मोबदला वाटप नियमानुसारच

## बरांज (मो) येथील दिव्यांग प्रकल्पग्रस्त जमीनप्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भद्रावती तालुक्यातील बरांज (मोकासा) येथील दिव्यांग प्रकल्पग्रस्त देवानंद पुनवटकर यांचे जमीन संपादन व मोबदला वाटप नियमानुसारच केल्याचा खुलासा वरोराचे उपविभागीय अधिकारी यांनी केला आहे.

बरांज मोकासा येथील भीमराव उद्धव पुनवटकर, संतोष उद्धव पुनवटकर, देवानंद उद्धव पुनवटकर आणि माजरी कॉलरी येथील सुलोचना वि. उद्धव पुनवटकर यांच्या मालकीची सर्व्हे नं. 281 आराजी 1.08 शेतजमीन प्रकरण क्र. 8/65/2005-06, निवाडा दि. 23 ऑक्टोबर 2009 रोजी व्हाईस प्रेसिडेंट, कर्नाटक एम्टा कोलमाईन्स लिमिटेड बंगलोर, शाखा नागपूर यांच्याकरीता संपादीत करण्यात आली होती. सदर कंपनीकरीता वरील निवाड्याप्रमाणे 330 शेतक-यांची एकूण 354.48 हे. आर. जमीन संपादीत करण्यात आली. निवाड्याप्रमाणे सर्व्हे नं. 281 आराजी 1.08 हे. आार. करीता हेक्टरी दर 1 लक्ष 80 हजार 700 रुपये देण्यात आला. त्यानुसार जमिनीचे एकूण मुल्यांकन 1 लक्ष 95 हजार 156 रुपये एवढे होते. त्यावर 30 टक्के दिलासा रक्कम 58547 रुपये व 12 टक्के प्रतिवर्ष प्रमाणे अतिरिक्त घटकाची 17 जानेवारी 2007 ते 23 ऑक्टोबर 2009 पर्यंत एकूण 1010 दिवसांची 64802 रुपये अशी एकूण 3 लक्ष 18 हजार 502 रुपयांची रक्कम भीमराव उद्धव पुनवटकर, संतोष उद्धव पुनवटकर, देवानंद उद्धव पुनवटकर आणि माजरी कॉलरी येथील सुलोचना वि. उद्धव पुनवटकर यांनी दि. 6 जून 2013 रोजी धनादेश क्रमांक 028726 अन्वये बँक खात्यात जमा करण्यात आली. तशी पोच मोबदला वाटप नोंदवहीमध्ये असून जमीन भुसंपादन व मोबदला वाटप नियमानुसारच केल्याचे स्पष्टीकरण वरोराचे उपविभागीय अधिकारी यांनी केला आहे.

# विजय जगताप यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सोनई :** महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कारासाठी सोनई येथील रहिवासी विजय जगताप यांची निवड झाल्याची माहिती महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या प्रतिनिधि श्रीमती उज्वला भोईटे यांनी विजय जगताप यांच्या निवासस्थानी जाऊन सदरच्या पुरस्कारासाठी आपली निवड झाली.असल्याचे सांगून त्यांना शासनाच्या वतीने पत्र देऊन त्यांचा सन्मान केला. सदरचा पुरस्कार हा 12 मार्च रोजी मुंबई येथे जे.जे.भाभा नाट्यगृह सभाग्राहत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार प्राप्तकर्ते विजय जगताप हे फुले शाहू आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते असून त्यांनी भारतीय दलित प्यान्थर या सामाजिक चलवळीतूनआपल्या सामाजिक कार्याला आज ते आर. पी. आय. या पक्षचे जिल्हाध्यक्ष पदी काम करत असून ते केंद्रीय सामाजिक त्यांचा केंद्रीय मंत्री नामदार रामदासजी आठवले यांचे अत्यंत विश्वसु कार्यकर्ते म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख आहे, पक्षाच्या माध्यमातून राजकीय, समाजिक क्षेत्रत भरीव कामे केले आहे, पुरस्कार निवड झाल्याने जिल्हाभर जगताप यांचे कौतुक होत आहे.

# कुणबी मराठा महासंघाच्या वतीने पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या वतीने उत्तर नगर जिल्हयातील पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप नेवासा येथे झालेल्या पदग्रहण सोहळयात करण्यात आले. नेवासा येथील हॉटेल प्रणाम च्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवासा वकील संघाचे माजी अध्यक्ष अँड. अशोकराव करडक हे होते तर अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद गुळभिले, राज्य प्रवक्ते प्रा.चंद्रसेन कोठावळे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप पोटे,महिला आघाडीच्या पुणे जिल्हा अध्यक्ष सौ.सपनाताई कदम,सचिव जी.के. गाडेकर,मराठवाडा विभाग अध्यक्ष डॉ.रंगनाथ काळे, संस्थापक कार्याध्यक्ष सतीश पवार,नगर उत्तर जिल्हाध्यक्ष अनिल पाटील ताके,अरुणराव काकडे,महिला आघाडी उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सौ.नीता हासे,महिला आघाडी कार्याध्यक्षा उज्वलाताई शिंदे,नेवासा तालुका अध्यक्ष भारत बेल्हेकर,तालुका उपाध्यक्ष बद्रीनाथ चिंधे पाटील, नेवासा शहराध्यक्ष अँड. संदीप शिंदे,प्राचार्य नितीन धस सर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी जिजाऊ वंदना गाण्यात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ.नीलिमाताई वाबळे,महिला आघाडी शहराध्यक्ष सौ.जयश्रीताई शिंदे यांनी औक्षण करून आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले.तर नवनिर्वाचित उत्तर जिल्हाध्यक्ष अनिल ताके पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात कुणबी मराठा समाजाच्या न्याय हक्कांसाठी आम्ही सर्वजण एकत्रित आलो असून आता समाज बांधवांमध्ये जनजागृती करण्यासाठी खेडोपाडी शाखा काढण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी नेवासा श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, राहाता, अकोले तालुक्यातून आलेल्या पुरुष, युवक व महिला नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शाल बुके व नियुक्ती पत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.नेवासा शहराध्यक्ष अँड.संदीप शिंदे यांनी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या वतीने आपल्याला न्याय हक्कासाठी लढा उभारायचा असल्याने पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी समजून महासंघाकडून आलेल्या सूचनांनुसार काम करावे असे आवाहन यावेळी बोलताना केले. यावेळी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद गुळभिले राज्य प्रवक्ते प्रा.चंद्रसेन कोठावळे,पुणे आघाडी महिला अध्यक्ष सौ.सपनाताई कदम,डॉ.रंगनाथ काळे कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड.अशोकराव करडक यांनी मराठा कुणबी महासंघाचा लढा आपल्या मुलाबाळांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्वाचा रहाणार असून त्यासाठी एकजुटीने काम करा,संघटन मजबूत करा एकमेकांमध्ये सुसंवाद ठेऊन संघटनेची ताकद वाढविण्यासाठी पुढे या असे आवाहन केले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले तर कुणबी मराठा महासंघाच्या नेवासा शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.जयश्रीताई शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा या राज्य गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.पदग्रहण कार्यक्रमाला उत्तर नगर जिल्ह्यातील पुरुष,युवक व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अधिकाऱ्यांवर कुणाचाही वचक नाही : कपिल दामोदर

## आगामी निवडणुकीत सर्व आंबेडकरी बहुजन समाजाला एकत्र करून ताकद दाखवू

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जिल्ह्यातील विकास कामांचा बेभरोसावर संबंधीत अधिकाऱ्यांवर कुठलेही वचक नाही असा आरोप करत आगामी निवडणूकीत सर्व आंबेडकरी बहुजन समाजाला एकत्र करून ताकद दाखवू देऊ असा इशारा भिमशक्ती या सामाजिक संघटनेच्या वतीने धुळे जिल्हाध्यक्ष कपिल दामोदर यांनी साक्री रोडवरील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या भवनात आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी त्यांनी सांगितले की धुळे जिल्ह्यातील होणाऱ्या विकासकामांना विकास कामे करतांना कुठल्याही प्रकारच्या कायदेशीर बाबी न तपासता धुळे जिल्ह्यातील संबंधीत अधिकारी बेकायदेशीरपणे मान्यता व निधी देणार आहे. अशी बाब समोर आली आहे. जिल्हा परिषद धुळे येथील रस्ते, मार्ग व पुल, जन सुविधा, तिर्थक्षेत्र इत्यादी असलेल्या योजना तसेच धुळे महानगरपालिकेतील संबंधी प्रशासकीय अधिकारी हे दलित वस्ती सुधार योजना व नगरोत्थान या योजनांना धुळे जिल्ह्यातील विकास कामांचा नियोजन बजेट होणार आहे. हा शासनाचा पैसा आहे, तो योग्य ठिकाणी कायदेशीर खर्च केला पाहिजे, या विकार कामांना तांत्रिक बाबी न तपासता विकास कामांचा प्रस्ताव संबंधीत अधिकारी मा. जिल्हाधिकारी सो. धुळे यांना पाठविण्यात येणार आहे. जिल्हा परिषद धुळे व महानगरपालिका धुळे विकार कामांची तांत्रिक बाबी तपासणी केल्याशिवाय कुठल्याही मान्यता देवून नये, निधी देवू नये. मागणीचे निवेदन नितीन गावंडे सो. उपजिल्हाधिका धुळे यांना दिले आहे. विकास कामे बेभरोशाने होणार असेल तसेच मंत्रालयातील धुळे जिल्ह्यातील विकास कामे करीता मला दलित चेहरा आहे म्हणून कामे मंजुर केली नाही असा आरोप देखील त्यांनी यावेळी केला.

# श्वानांचा हैदोस

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** शहरात २०२३-२४ या वर्षात आतापर्यंत एकूण १५ हजार ५७९ श्वानदंशाच्या प्रकरणांची नोंद झाली असून भटक्या कुत्र्यांच्या प्रजनन दराच्या तुलनेत दरवर्षी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केल्या जाणाऱ्या कुत्र्यांची संख्या कमी असल्याने अमरावती शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळविण्यात महापालिकेला अद्यापही यश आलेले नाही. कुत्र्यांची नेमकी संख्या किती याची संख्या महापालिकेकडे नाही. शहरात सुमारे ३० हजारांवर मोकाट कुत्रे असल्याचा अंदाज आहे. गल्लीबोळातच नव्हे, तर मुख्य रस्त्यांवर कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. मोकाट कुत्र्यांकडून घातला जाणारा धुमाकूळ ही चिंतेची बाब झाली असताना पालिकेची यंत्रणा त्यांच्यावर नियंत्रण घालण्यात अपयशी ठरली आहे. शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या इतकी मोठी असूनही त्यांना पकडण्याची व्यवस्था अतिशय तोकडी आहे. कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करण्याची महापालिकेची उपाययोजना तोकडी पडत असल्याने कुत्र्यांचा बंदोबस्त करा वा पूर्वीप्रमाणे भटक्या कुत्र्यांना मारण्यात यावे ही मागणी अनेकदा केली गेली.

# प्रा.समीर घोडेस्वार यांचा महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेतर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ वार्षिक सहविचार- सभा २०२३-२४, डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय जळगाव येथे आज दि.१०/३/२४ रोजी दुपारी १२ वा. घेण्यात आली. सहविचार सभेच्या शेवटच्या सत्रात जामनेर तालुका कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे सहसचिव तथा इंदिराबाई ललवाणी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपशिक्षक प्रा.समीर विष्णू घोडेस्वार यांनी अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय खेलोमास्टर ॲथलेटिक्स स्पर्धेत हॅट्रिक कांस्यपदक पटकविल्याबद्दल तसेच राष्ट्रीय,राज्यस्तरीय विविध आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल, जिल्ह्यात शिक्षक संघटनेत उपक्रमशील, कार्यशील असल्याने त्यांचा यथोचित सत्कार महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ.संजय शिंदे (नाशिक), अँड.संदीप गुळवे (नाशिक) यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. याप्रसंगी जळगाव जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रा.नंदन वळींकार, उपाध्यक्ष डॉ.अतुल इंगळे,कार्याध्यक्ष प्रा. शैलेश राणे, सरचिटणीस प्रा.सुनील सोनार, जेष्ठ मार्गदर्शक प्रा.सुनील गरुड आदी.मान्यवर तर जळगाव जिल्ह्यातून विविध तालुकाध्यक्ष पदाधिकारी शिक्षकवृंद, भगिनी व मान्यवरांची यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# प्लास्टिकमुक्त शाळा प्लास्टिकमुक्त समाज

## शिक्षिका किरण साकरकार यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**अमरावती :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर जिल्हा अमरावती येथील शिक्षिका किरण साकरकार यांनी विद्यार्थ्यांना प्लॅस्टिक चे दुष्परिणाम या विषयावर कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि प्लास्टिक आपल्यासाठी व इतर घटकासाठी सुद्धा किती हानिकारक आहे याबाबत मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांना प्लास्टिक मुक्त शाळेसंबंधी तसेच इतरही प्लॅस्टिक न वापरावे यासंबंधी शपथ दिली. आणि विद्यार्थ्यांना कागदी पिशव्या व कापडी पिशव्या बनवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदामध्ये कागदी पिशव्या तसेच कापडी पिशव्या बनवल्या.
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा ही शाळा ISO असून या शाळेमध्ये उपक्रमशील शिक्षिका किरण साकरकार कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या तसेच समाजाच्या हिताकरिता शिक्षिका किरण साकरकार यांनी प्लास्टिक मुक्त शाळा प्लास्टिक मुक्त समाज हा उपक्रम राबविला. त्यानिमित्ताने त्यांचे गावचे कर्तव्यदक्ष सरपंच मा.नारायणरावजी बोरेकार यांनी अभिनंदन केले. पालकांनी तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांनी शिक्षकांना व विद्यार्थ्यांना या नाविन्यपूर्ण उपक्रमासंमंधी शुभेच्छा दिल्या.

# राज्यात पुन्हा १० हजार शिक्षकांची भरती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नुकतीच राज्यात अकरा हजार शिक्षकांची भरतीची यादी जाहीर झाली आहे. अनेक जिल्ह्यात कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. यानंतर आता शिक्षक भरतीसाठी पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सरकारी व अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. तसेच दर वर्षी निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे दरवर्षी रिक्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या वाढत जात आहे. त्याचा विचार करून दरवर्षी शिक्षकांच्या जागा भरती करणे गरजेचे बनले आहे. मात्र पाच ते सहा वर्षांतून एकदा शिक्षक भरती केली जात आहे. त्यामुळे अनेक शाळांची मोठी अडचण होत असल्याने शिक्षण खात्याने दरवर्षी टीईटी घेऊन अधिक प्रमाणात शिक्षकांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात दहा हजार शिक्षकांच्या भरतीसाठी जून महिन्यात टीईटी होणार आहे. त्यामुळे शिक्षण खात्याने टीईटीची तयारी करण्याची सूचना केली असून, परीक्षेचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. राज्यात रिक्त असलेल्या शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी शिक्षण खात्याकडून २०१४ पासून टीईटी परीक्षा घेतली जात आहे. मात्र, टीईटी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या परीक्षार्थींचे प्रमाण अतिशय कमी असल्याने शिक्षक भरती करण्यास अडचण निर्माण होत आहे.
तसेच टीईटी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींची सीईटी परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेत पास होणाऱ्या परीक्षार्थींना गुणवत्तेनुसार शिक्षक भरतीसाठी प्राधान्य दिले जाते. मात्र सीईटी पास होणाऱ्या परीक्षार्थींची संख्या दोन ते तीन टक्के असते.



# गणेश मंदिराच्या वतीने महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील शिवाजी नगरातील, अष्टविनायक गणेश मंदिरात 8 मार्च रोजी महिला दिन उत्सहात साजरा करण्यात आला. या मंदिरात धार्मिक कार्यक्रमाबरोबरच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यापूर्वी येथे महिला बचतगट तालुका कार्यशाळा,गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ, आई महोत्सव, योग शिबिर,तालुकास्तरीय भजन स्पर्धा, अंधश्रद्धा निर्मूलन व ईतर प्रबोधन पर कार्येक्रम घेण्यात आलेले आहेत.
8मार्च रोजी आपले घरकाम सांभाळून,धार्मिक व सामाजिक कार्यात हिरहिरीने भाग घेणाऱ्या महिलांचा मंदिर समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीकांत कुलकर्णी, के.सी. घुगे यांनी मार्गदर्शन केले. ह्या कार्यक्रमासाठी के.सी. घुगे, पंढरीनाथ बुधवंत, दत्तात्रय घुगे, सोनू सांगळे,लहाने सर यांनी पुढाकार घेतला. याप्रसंगी जेष्ठ नागरिक ग्यानदेव सांगळे, हरिनारायण घुगे,सोनाजी घुगे, प्रकाश ससे, निवृत्ती गीते, तुकाराम ननेर उपस्थित होते.



# महिलांनी वाचनात रुची वाढवावी : औटे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरा लगत मक्रणपुर येथील प्रज्ञाशोध सार्वजनिक वाचनालय येथे महीला दिन साजरा करण्यात आला. या वेळी ग्रंथपाल सुवर्णा औटे यांनी वाचनाची गोडी कशी निर्माण करावी तसेच वाचनात रुची कशी वाढवावी व वेगवेगळ्या पुस्तकाची माहिती देऊन महीला दिन साजरा करण्यात आला. या वेळी ग्रंथपाल सुवर्णा औटे, ज्योती लोंढे, आशाबाई लोंढे, पुष्पा लोंढे, उज्वला लोंढे, ललीता जाधव , सुरेखा भोसले, ज्योती सुनिल लोंढे इत्यादी महीलांची उपस्थीती होती.



# महिलांना उद्योग व्यवसायासाठी हवे ते मार्गदर्शन करण्यात येईल : आ. बोर्डीकर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतर :** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)परभणी मुख्यमंत्री महीला सशक्तीकरण अभियान तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत एकता लोक संचलित साधन केंद्र जिंतूर स्थापित स्वयं सहायता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाचे व वस्तू चे भव्य विक्री प्रदर्शन चे आयोजन जिल्हा परिषद शाळा मैदान जिंतूर येते दिनांक 06 मार्च 2024 ते 09 मार्च 2024 या कालावधी मध्ये नवतेजस्वीनी तालुका स्तरीय प्रदर्शन 2024 चे आयोजन केले आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटन आ. मेघना साकोरे बोर्डीकर विधानसभा सदस्य जिंतूर व सेलु मतदारसंघ यांच्या हस्ते करण्यात आले. सुनिल नवसारे सहा. महा प्रबधक नाबार्ड परभणी, सुरेश पवार, अविनाश समाले, शिवराज केंद्रे गट विकास अधिकारी पंचायत समिती परभणी, अ. ए.चौधरी सहा आयुक्त अन्न व प्रशासन विभाग, टी.एस. पोले.गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती जिंतूर. डॉ . प्रशांत बामणे तालुका आरोग्य अधिकारी जिंतूर, बाळासाहेब झिजाडे. जिल्हा समन्वय अधिकारी मविम, डॉ. विद्या चौधरी महिला जिल्हाअध्यक्ष ग्रामीण चव्हाण पशसंवर्धन विभाग जिंतूर, शिरीष. शि. गलकाटू, शेळके .के.के . तालुका कृषी कार्यलय जिंतूर, किरण राठोड, कोकने के . एस प्रकल्प अधिकारी जिंतूर . डॉ प्रनित दराडे विधान सभा प्रमुख, पूजा शिपले, कांता चौधरी, संगीता जाधव, शोभा नेदरे उपस्थित होते. चालु आर्थिक वर्षात 46 कोटी रु कर्ज वाटप करण्यात आले प्रतनिधिक स्वरूपात 7 बचत गटांना धनादेश कर्ज वितरण करण्यात आले. यशस्वी उद्योजक महिलाचा सन्मान करण्यात आला त्याच बरोबर जिल्ह्यातील 8 लोक संचलित साधन केंद्र चे सत्कार करण्यात आले . तसेच सर्व मान्यवरांनी स्टॉल चे पाहणी केली व महिला चे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री बाळा साहेब झिंजाडे यांनी केले सूत्रसंचलन जयश्री टेहरे यांनी केले तर आभार भावना कुलकर्णी यांनी मानले.



# हिंदवी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने वाशी येथे महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वाशी :** महाराष्ट्र जिल्ह्यातील वाशी येथे हिंदवी योगा सेंटर मार्फत इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय वाशी, या ठिकाणी, सर्व वाशी तालुक्यातील महिलांना एकत्र करून जागतिक महिला दिवस साजरी करण्यात आला.
वाशी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.डॉ.विनिता बाराते मॅडम तर प्रमुख पाहुणे श्रीमती सविता पवार यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्याचबरोबर श्रीमती सुवर्णा कवडे, कसबे, प्रगती, माळी, प्रेमा, पुनम, आरती, मंजू, सोनाली, पूजा, गायत्री, अर्चना, सन्वी, अश्विनी, मनीषा, सुलेक्षणा, क्रांती, गोखरणा, उर्मिला, कार्तिकी, प्राजक्ता, स्वारा, सई, तनुजा, मनीषा, निकिता, उर्मिला, या सर्व उपस्थित महिलांचे पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला आशा कार्यकर्त्या महिलांचीहि उपस्थिती होती.
या कार्यक्रमादरम्यान श्रीमती रसाळ आणि श्रीमती डॉक्टर बाराते यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांना संबोधित करताना महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देत महिलांनी आपल्या शरीराची काळजी कशी घ्यावी? याबाबत मार्गदर्शन केले.शरीराला व्यायामाची गरज आहे. सुदृढ आहाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महिलांनी फक्त एकच दिवस महिला दिन साजरा करून आपली खुशी आपलं सुख न मानता वर्षातील 365 दिवस कसे आनंदीत जातील किंवा प्रत्येक दिवसच हा महिलांचा असेल किंवा तो कसा बनवता येईल यासाठी सर्व महिलांनी त्याबद्दल नियोजन करावे असे मार्गदर्शन डॉ.बाराते यांनी केले.

# उल्हासनगर महापालिका परिवहन ई-बसचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज



**उल्हासनगर :** महापालिका परिवहन ई- बससेवा व सिंधूभवनचे लोकार्पण बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार बालाजी किणीकर, आयुक्त अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर आदींच्या हस्ते संपन्न झाले.
उल्हासनगर महापालिका परिवहन ई-बससेवा, सिंधू भवन लोकार्पण सोहळ्याच्या प्रतिक्षेत होती.अखेर शहाड डेपो येथे परिवहन ई-बस सेवा तसेच उल्हासनगर प्रभाग समिती क्रमांक 2 च्या शेजारी असलेल्या सिंधुभवन इमारतीचे लोकार्पण बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार बालाजी किणीकर, आयुक्त अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, शहर अभियंता संदिप जाधव व परिवहन बस विभाग प्रमुख विनोद केणे आदींच्या हस्ते झाले आहे. महापालिका परिवहन बसच्या तिकिटाचे भाडे निश्चित करण्यात आले. किमान १० रुपयात नागरिकांचा गारेगार प्रवास होणार आहे.

बस डेपो,चार्जिंग स्टेशन, बस स्टॉप सज्ज असून बसचे मार्गही निश्चित झाले झाले. रस्त्यावरून बस धावणार असल्याने, नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. महापालिका सिंधूभवनचे लोकार्पण झाले असून तीन मजली भवनात एक सभागृह आहे. सिंधू संस्कृतीचे वास्तू येथे ठेवण्यात येणार आहेत. लोकार्पण नंतर शहरातील रस्त्यावरून बस धावणार असून बस डेपो, चार्जिंग स्टेशन, चालक व वाहक सज्ज आहेत. केंद्राने चार्जिंग स्टेशनसाठी ५ कोटी तर केंद्राकडून बस डेपोसाठी १५ कोटी ३० लाख व डेपोच्या नदी किनारी संरक्षण भिंत बांधण्यात साठी ३ कोटी मंजुरी दिली आहे. तसेच केंद्राकडून १०० बसेस महापालिकेला लोकसभा - निवडणुकीनंतर मिळणार आहे. महापालिका परिवहन ई-बससेवा लोकार्पणसाठी नागरिकांनीही गर्दी केली होती.
अंबरनाथ पूर्व कानसई विभाग येथे अनेक वर्ष दुरावस्थेत असलेल्या पंडित जव्हारलाल नेहरू उद्यानाचा कल्याण लोकसभेचे खासदार यांच्या संकल्पनेतून तसेच आमदार डॉक्टर बालाजी किणीकर यांच्या प्रयत्नातून कायापालट करण्यात आला उद्यानाचा भव्य लोकार्पण सोहळा श्रीकांत शिंदे साहेब यांच्या शुभास्ते संपन्न झाला.
रंगबेरंगी फुले, जॉगिंग ट्रॅक, लहान मुलांन करिता किड्स झोन, दर्जेदार खेळणी, स्केटिंग ट्रॅक, चहा पाण्या करिता आकर्षक डिझाइंड कॅफेटेरिया, ई. ने बाहरलेल्या ह्या उद्यानाचे नविन रूप पाहून सारेच भारावून गेले. यावेळी अंबरनाथ मधिल प्रमुख नेते, नगरसेवक, पदाधिकारी, डॉकटर्स, रोट्रीयन्स, जेष्ठ नागरिक संघ, सर्व धर्मीय प्रमुख, महिला, युवक, तसेच जेष्ठ नागरिक उपस्थित होते.



# दादुलगाव ग्रामस्थांच्या वतीने आ. डॉ. संजय कुटेंचा भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** दादुलगाव येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नमुना ड नुसार मोबदला मिळाल्याने १० मार्च रोजी ग्रामस्थांच्या वतीने आमदार डॉक्टर संजय कुठे यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

गेल्या चार वर्षापासून प्रकल्पग्रस्ताना न्याय मिळावा व शेतकऱ्यांना नमुना ड नुसार मोबदला मिळावा यासाठी विद्यमान आमदार डॉक्टर संजय कुटे संघर्ष करत होते.अनेक वेळा जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठकी घेतल्या, मंत्रालय स्तरावरून मार्गदर्शन आणले तरीसुद्धा शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला मिळत नव्हता. अखेर 22 ऑक्टोबर 2020 रोजी प्रकल्पग्रस्त यांच्या समवेत आमदार संजयजी कुटे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन दिवस ठिय्या आंदोलन केले प्रकल्पग्रस्ता समवेत रात्रभर उघड्यावर झोपले.36तासाच्या ठिय्या आंदोलन नंतर जिल्हाधिकारी यांनी नमुना ड नुसार मोबदला देण्याची लेखी पत्र दिले तरीसुद्धा शेतकऱ्यांना नमुना ड नुसार मोबदला मिळाला नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचे काम महाविकास आघाडीचे सरकार असताना होत होते. परंतु सुदैवाने भाजपा सेना युतीचे पुन्हा सरकार आले. माननीय उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिगाव प्रकल्पाच्या नियमक मंडळाच्या 83 व्या बैठकीमध्ये संयुक्त मोजणी मधून वगळण्यात आलेल्या मालमत्तांसाठी 62 कोटी रुपये मंजूर केले.त्यानुसार दादुलगाव येथे शेतकऱ्यांना आमदार संजयजी कुटे यांच्या हस्ते धनादेश वितरित करण्यात आले.या वेळी ॲड.सुधाकर दळवी ,मा. जी. प.सदस्य बंडू भाऊ पाटील, कार्यकारी अभियंता मेतकर साहेब, काळे साहेब,राठोड साहेब यांच्यासह पंचक्रोशी मधील सरपंच,उपसरपंच, व नागरिक व गावकऱ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर खाळपे व प्रास्ताविक मोहनभाऊ गई यांनी केले तर आभार प्रदर्शन नामदेव गवळी यांनी केली.

# सतत बंद असणाऱ्या कोळपेवाडी पोलीस आऊट पोस्टमुळे गुन्हेगारीत वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील कोळपेवाडी पोलिस औट पोस्ट ला नेमणुकिस असणारे पोलीस कर्मचारी तालुका पोलीस ठाण्यात सेवा बजावत असल्याने परिसरात गुन्हेगारी मध्ये वाढ होवून अवैध धंद्याना सुगिचे दिवस आले आहे.

कोळपेवाडी औट पोस्ट ला पोलीस दादा अभावानेच आढळत असल्याने दुचाकी वाहन विद्युत पंप स्टार्टर ईलेक्ट्रिक केबल चोरी ला जाण्याचे प्रकार नित्याचेच झाले असुन चोरी झालेल्या घटनेचा तपासच लागत नसल्याने गुन्हेगार मोकाट तर अवैध धंदे सुसाट अशी परिस्थिती कोळपेवाडी परिसरात निर्माण झाली आहे. चोरट्यांनी मंदिराच्या दान पेट्यांना लक्ष केल्याने देवालयही सुरक्षित राहिले नाहीत एक वर्षाच्या कालावधी मध्ये दोन मंदिराच्या दान पेट्या दुचाकी वाहणे डिझेल चोरी चे गुन्हे पोलीस दप्तरी नोंद झाले असले तरी तपास मात्र शुन्य असल्याने गुन्हेगारी मध्ये वाढ होत आहे. अवैध धंद्याना पोलीस यंत्रणेकडुन मिळणाऱ्या अभयामुळे परिसरात चोरट्यांची मुजोरी वाढत जावुन ' चोरी ' हा आमचा पेशा असुन मुद्दे मालावर आमचाच हक्क असल्या प्रमाणे वारंवार किराणा दुकान मोबाईल शाँपी ला चोरट्यांनी आपले लक्ष बनवले आहे. कोळपेवाडी पोलीस औट पोस्ट ला चोवीस तास एक तरी पोलीस कर्मचारी नेमणूकीस असावा यासाठी ग्रांमस्थ प्रयत्नशिल असुन पोलीस निरीक्षक यांची भेट घेवून परिसरात वाढलेली गुन्हेगारी व अवैध धंद्याचे अवलोकन देणार आहेत.



# माझ्या यशाचे श्रेय आई-वडिलांना जाते : डॉ. स्वप्नाली घोडके

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** वैद्यकीय अधिकारी या पदावर पोहोचण्यासाठी निश्चितच माझ्या आई-वडिलांनी अपार कष्ट घेतले म्हणून माझ्या यशाचे श्रेय माझ्या आई-वडिलांनाच जाते असे गहीवरून हृदयपूर्वक उद्गार कु.डॉ.स्वप्नाली घोडके यांनी सत्कारास उत्तर देतानी काढले.

धाराशिव तालुक्यातील खेड येथील कु.डॉ.स्वप्नाली प्रकाश घोडके यांची तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य अधिकारी म्हणून दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी नियुक्ती असल्याने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत प्रबुद्ध रंगभूमी बहुउद्देशीय संस्था कळंबच्या वतीने डॉ.स्वप्नाली यांचा ह.भ.प.महादेव महाराज आडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली सत्काराचे आयोजन दिनांक ८ मार्च २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात आले होते.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सुभाष घोडके,माधवसिंग राजपूत आदींनी आपल्या मनोगतातून जागतिक दिनाचे महत्त्व विषद करत डॉ.स्वप्नाली यांच्याकडून प्रामाणिकपणे कर्तव्याचे पालन करण्याची आशा व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.
अध्यक्षीय भाषणातून ह.भ.प महादेव महाराज यांनी डॉ.स्वप्नाली यांना घडवण्यात त्यांच्या आई-वडिलांचे खूप मोठे योगदान असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अविनाश घोडके यांनी केले तर आभार पिंपळगाव (डोळा) येथील अंगणवाडी सेविका सौ.पल्लवी घोडके यांनी मानले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नवनाथ भंडारे,पत्रकार सिकंदर पठाण, संघर्ष घोडके,उत्कर्ष घोडके,थोडसरवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापिका मंगल आवटे-घोडके,खादीग्रामोद्योग संघाच्या संचालिका रंजना घोडके,रुपाली घोडके आदींची उपस्थिती होती..



# शिक्षकाने केला मुलींचा विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्री तालुक्यातील दहिवेल येथे एका शिक्षकाच्या हातून गंभीर विषय निर्माण झाला आहे उत्तमराव पाटील विद्यालय येथे शिक्षण घेत असलेल्या आदिवासी मुलींचा घाणेरडा बिभस्त्य फोटो विद्यालयातील एका व्हाट्सअप ग्रुप वर टाकण्यात आला होता त्या संदर्भात कुठलीही कारवाई न झाल्याने महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान समितीतर्फे पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयाला निवेदन देण्यात आले. साक्री तालुक्यातील उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय दहिवल येथे आदिवासी मुलीसोबत विचित्र प्रकार पाहायला मिळाला आहे त्या विद्यालयात अविनाश पाटील नामक शिक्षकाने त्यांच्या व्हाटसप ग्रुप वर मुलींचे विचित्र फोटो अपलोड केले त्या सरंदर्भात त्या शिक्षकांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई संदर्भात सायबर क्राईम येथे निवेदन दिले होते परंतु महिना उलटून देखील त्यांच्यावर कुठलीही कारवाई झाली नाही व त्या शिक्षकांनी देखील सायबर क्राईम ला अर्ज केला आहे की माझं व्हाट्सअप हॅक झाल आहे....!व ती पोस्ट मी टाकली नाही परंतु आदिवासी बचाव अभियान समितीचे असे म्हणणे आहे की या प्रकरणात दोघांच्या अर्जाची कुठलीही दखल घेतली नाही व संपूर्ण प्रकार पारदर्शीपणे दिसून येत असल्याने तरीदेखील शिक्षकावर कारवाई नाही असा आरोप या ठिकाणी करण्यात आला. व या ठिकाणी असे सांगण्यात आलेली त्या विद्यालयात या प्रकरणासंदर्भात मोठी चर्चा सुरू असल्यामुळे व कारवाई होत नसल्यामुळे त्या पीडित मुलींची मानसिकता गंभीर झाली आहे व त्यांना तात्काळ न्याय मिळावा हीच अपेक्षा घेऊन निवेदन देण्यात आले आहे.

# कात्रज घाटात वणवा; रात्री उशिरा आग आटोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कात्रज घाटात वणवा लागल्याची घटना रविवारी रात्री घडली. अग्निशमन दलाने पाण्याचा मारा करून रात्री उशिरा आग आटोक्यात आणली. कात्रज घाटातील डोंगरावर रविवारी रात्री झाडांचा पाचोळ्याला आग लागली. मोठ्या प्रमाणावर धूर झाल्याचे वाहनचालक, तसेच रहिवाशांनी पाहिले. कात्रज येथील अग्निशमन दलाला माहिती कळविण्यात आली. अग्निशमन दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आग अन्यत्र पसरू न देण्याची काळजी जवानांनी घेतली. उन्हाळ्यात शहरातील टेकड्या, मोकळ्या जागेत पडलेल्या पालपाचोळ्याला आग लागण्याच्या घटना घडतात. आठवड्यापूर्वी येरवडा येथील डेक्कन कॉलेजच्या आवारातील मोकळ्या जागेत वणवा पेटला होता. यापूर्वी तळजाई, वेताळ टेकडी परिसरात वणवा पेटला होता. वाढत्या उन्हामुळे वणवा पेटण्याच्या घटना घडतात.

# जोपर्यंत आरक्षण नाही तोपर्यंत मतदान नाही

## निरेत खासदार सुप्रियाताई सुळे यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** अखिल भारतीय मराठा महासंघ यांच्या वतीने निरा-शिवतक्रार, ता. पुरंदर येथे खासदार सुप्रियाताई सुळे यांना मराठा आरक्षण प्रश्नी एक निवेदन देण्यात आले.जोपर्यंत आरक्षण नाही तोपर्यंत मतदान नाही.अशा भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आलेल्या आहेत.अखिल भारतीय मराठा महासंघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष जेधे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आलेले आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, आदरणीय मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार सकल मराठा समाजाच्या वतीने आरक्षण नाही मतदान नाही.असा ठराव असून आपण याकडे लक्ष द्यावे.खासदार सुप्रियाताई सुळे आम्ही सकल मराठा समाजाच्या आरक्षणावर ठाम असून आपल्या माध्यमातून याकडे लक्ष देण्यासाठी हे निवेदन देत आहोत. आज पर्यंत मराठा समाजातील खूप युवक युवतींनी यासाठी बलिदान दिले.सरकार गांभीर्याने घेत नसून सकल समाजात असंतोष असून आपली भूमिका यावर केंद्रित करून हा आवाज उठवावा.ही नम्र विनंती व जोपर्यंत आरक्षण नाही. तोपर्यंत मतदान नाही.असे म्हणण्यात आलेले आहे. हे निवेदन खा.सुप्रियाताई सुळे यांनी हातात घेताच क्षणी सध्याचे सरकार फसवणूक करते हे तुम्हाला मान्य आहे का?असा सवाल उपस्थित केला. यावेळी मराठा आंदोलक व सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांनी 'हो' असे उत्तर दिले. निवेदनावर सचिन मोरे, राहुल कदम, चंद्रशेखर पवार, रामचंद्र शिंदे, उमेश थोपटे, महेश जेधे, बाबर साहेब, महेश धायगुडे, निखिल लकडे आदींच्या सह्या आहेत.

या निवेदनास पाठींबा म्हणून धनगर समाजातील दोन बांधवाने निवेदनावर सही करून या भूमिकेबद्दल समर्थन दिले.मराठा आंदोलक व सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे म्हणाले की,गेली कित्येक वर्ष मराठा समाज आरक्षणामुळे हुशार



बुद्धिमत्ता असून देखील विद्यार्थी विद्यार्थिनी खूप अभ्यास करून चांगले टक्केवारी मिळवतात.परंतु एखाद्या मार्कासाठी त्यांचे ॲडमिशन होत नाही. त्यामुळे तरुण नैराश्यात जाताना आणि शिक्षणावरील विश्वास उडताना दिसत आहे.त्याचे एकमेव कारण म्हणजे मराठा समाजाला आरक्षण नसल्यामुळे नोकरी शिक्षण याच्यापासून वंचित राहावे लागत आहे.कित्येक पिढ्यान पिढ्या आरक्षणाविषयी बोलत आले आहेत.परंतु जे प्रतिनिधी निवडून दिले.अद्याप त्यांनी आरक्षण दिले नाही.त्यामुळे आम्ही आदरणीय मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार सकल मराठा समाज मतदान करणार नाही.असा निर्णय घेण्यात आला.अखिल भारतीय मराठा महासंघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष जेधे म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी समाजात एकी राहावी म्हणून अखिल भारतीय मराठा महासंघाची निर्मितीच स्वर्गीय आण्णासाहेब पाटील यांनी केली.त्यावेळी अख्ख्या महाराष्ट्राने एकीचे बळ पाहिले.मराठा महासंघाच्या अनेक शिलेदारांनी आरक्षणासाठी विविध आंदोलने यशस्वीपणे करून दाखवली आहेत.आता संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली जे आदेश येतील तसे कार्य सुरू आहे. म्हणून अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने खासदार सुप्रियाताई सुळे यांना समाज बांधवांच्या सह्या सहित हे निवेदन देण्यात आले. आपण याकडे गांभीर्याने पाहावे.असे म्हटले आहे.निरा शिवतक्रार गावांमध्ये कोणत्याही पक्षाचा नेता आल्यानंतर त्यांना मराठा महासंघाच्या वतीने अशा प्रकारे निवेदन देऊन हीच भूमिका मांडण्यात येणार आहे.असे सुद्धा सांगण्यात आलेले आहे.

# महाविकास आघाडीला भक्कम करण्याची जबाबदारी बाळासाहेब देशमुख यांच्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** आगामी लोकसभा, विधानसभा व सर्व निवडणुका ह्या महाविकास आघाडीने संयुक्तपणे सामोरे जाण्याचे व त्या अनुषंगाने एकत्रित काम करण्याचे निर्देश राज्यस्तरीय महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांकडुन देण्यात आले आहेत. वाशिम जिल्ह्यामध्ये काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या तीनही पक्षांची प्रचंड ताकत आहे शिवाय महाविकास आघाडी च्या विचारांना सामन्य जनतेचा प्रचंड पाठिंबा पाहायला मिळतो. हि सर्व ताकद एकसंघ करून आगामी सर्व निवडणुकित विजय मिळवण्याचा मानस सर्व नेत्यांचा तथा कार्यकत्यांचा आहे त्या पार्श्वभुमीवर वाशिम जिल्हा महाविकास आघाडीमध्ये समन्वय राखण्यासाठी व महाविकास आघाडीला अधिक भक्कम करण्यासाठी समन्वयक म्हणुन एखाद्या व्यक्तीने काम करणे अतिशय गरजेचे आहे आणि हि बाब लक्षात घेऊन काँग्रेस जिल्हा अध्यक्ष आमदार अमितभाऊ झनक, शिवसेना जिल्हा प्रमुख (क.बा. ठा) सुरेशभाऊ मापारी, रा.काँ.प. (शरदचंद्र पवार) जिल्हा अध्यक्ष बाबारावजी खडसे यांच्या वतीने वाशिम जिल्हा महाविकास आघाडी समन्वयक या पदावर श्री. सुधाकर (बाळासाहेब) काशिराव देशमुख यांना नियुक्त करण्यात आले. बाळासाहेब देशमुख यांच संघटन कौशल्य हे कायमच चमत्कारीक परिवर्तन घडवणारे राहिल आहे. अभ्यासू, सूक्ष्म-नियोजन आणि योग्य राजकीय समज असलेल्या व्यक्तिच्या झालेल्या ह्या निवडीने महाविकास आघाडीत चैतन्याचे वातावरण निर्माण होऊन आगामी निवडणुकी साठी महाविकास आघाडीनी आपली पाऊले टाकण्यास सुरवात केली आहे असे प्रामुख्याने दिसून येते.



# शेतकरी महिला गटाला पुस्तके वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथील उंच भरारी शेतकरी महिला गटाने भरारी भरत राज्यात दुसरा क्रमांक पटकावला त्यांचे तालुकाभर कौतुक अभिनंदन सत्कार सुरु आहे.त्यातच महिलांनी कौतुकास्पद कार्य कामगिरी बद्दल सोबलगांव येथील उंच भरारी शेतकरी महीला गट यांनी राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला त्या बद्दल सौ.ऊषा साळुंके यांनी त्यानां सकारात्मक विचाराचे 1) परीवर्तन भीती नव्हे संधी - 6 पुस्तके 2 ) ईच्छा शक्तीचा चमत्कार - 6 पुस्तके 3 ) तुम्ही तुमचेभाग्यविधाते - 4 पुस्तके 4 ) योग्य निर्णय घेण्याची कला - 4 पुस्तके असे एकुण - 20 पुस्तके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या व पुढे उंच उंच भरारी शेतकरी महिला गटाने घ्यावी म्हणून सतत समाज कल्याण कार्य करावे असे आवाहन केले.

# आ. झनकांच्या हस्ते मतदार संघात विकासकामांचा झंझावात

## तब्बल 18 कोटींच्या कामाचे भूमिपूजन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** मालेगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार तथा जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी वाशिम यांच्या हस्ते आज दिनाक 10 मार्च रोजी सकाळी 9 वाजता तालुक्यातील ग्राम बोरखेडी येथून तब्बल 18 कोटी 15 लक्ष रुपयांच्या विकास कामांचा मतदारसंघात शुभारंभ करण्यात आला.यामधे बोरखेडी ते मोप रस्त्याची दर्जोन्नती करणे 2 कोटी 3 लक्ष रुपये, अर्थसंकल्पीय कामातून बोरखेडी ते वाकद रस्त्याची सुधारणा करणे 2 कोटी 58 लाख, बोरखेडी ते शेलु खडसे रस्त्याची सुधारणा करणे 1 कोटी 16 लाख रुपये मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत प्रजिमा -60 अंतर्गत कण्हेरी रस्त्याची सुधारणा करणे 71लक्ष रू. तसेच बोरखेडी येथे आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत अण्णाभाऊ साठे सभागृह बांधकाम 10 लक्ष रू,रिसोड ते पवार वाडी रस्त्याची सुधारणा करणे 1कोटी 95 लक्ष, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रिठद ते ढोरखेडा रस्ता करणे 5 कोटी 78 लक्ष, रिठद येथे आमदार विकास निधी अंतर्गत सिमेंट रस्ता 12 लक्ष रू, कोयाळी भिसडे येथे स्मशान भूमी सौंदर्यीकरण 7 लक्ष तसेच सभागृह बांधकाम 10 लक्ष, तसेच मुख्य मंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत कोयाळी ते कोयाळी भिसडे ते वरूड तोफा रस्ता करणे 3 कोटी 38 लक्ष, असे एकूण 18 कोटी 15 लक्ष रुपयांचे भूमिपूजन रिसोड मतदार संघात करत आमदार अमित झनक यांनी एक प्रकारे विकास कामांचा झंझावात केल्याने मतदार संघातील नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दिलीपराव सरनाईक महासचिव प्रदेश काँग्रेस, तसेच सभापती वैभव सरनाईक, संजय शिंदे, अमित खडसे, विष्णुपंत भुतेकर, राजाराम आरु, बाळासाहेब देशमुख, बबन गारडे, धनंजय बोरकर,विश्वनाथ सानप, डॉ रामेश्वर नरवाडे सचिन इप्पर,सोनू बाबा सरनाईक, बबन सानप,संतोष जाधव, अण्णा पाटील शिंदे,सुभाष बोरकर, रामेश्वर देवकर, शिवाजी काकडे प्रकाश वायभासे, गजानन आरु, दिनकर बोरकर,रमेश भिसडे, गोपाल खांनझोडे, पंढरी देवढे,घनशाम मापारी, रवी चोपडे, संजय सदार, बाबाराव ढोणे, अनिल शिंदे, पंजाब खडसे, बालाजी भिसडे, कैलास लांडगे, आत्माराम शिंगाडे,अर्जुन खरात,संतोष अंभोरे सतीश मानवतकर यांच्यासह विविध जिल्हा परिषद गणातील शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.





# १९ मार्च रोजी खुरगावला पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात १९ मार्च रोजी पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात परित्राणपाठ, गाथापठण, बोधी पुजा, त्रिरत्न वंदना, ध्यानसाधना, भोजनदान यासह थायलंड धम्माभ्यास दौऱ्याहून आलेल्या चाळीस उपासकांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांनी दिली.

याच महिन्यात चाळीस उपासकांसह थायलंड दौरा करून भदंत पंयाबोधी थेरो हे परतले आहेत. थायलंडच्या उपासक उपासिकांनी येथील भिक्खू संघासाठी १०० चीवर दान दिले. देशातील २४ तास चालणारे पहिले श्रामणेर प्रशिक्षण केंद्र हे भदंत पंयाबोधी थेरो यांनी निर्माण केले आहे. आत्तापर्यंत जवळपास साडेबाराशे उपासक श्रामणेर दीक्षित झाले आहेत. काही मुली सुद्धा श्रामनेरी झाल्या. समाजाच्या दानातून हे श्रामनेर प्रशिक्षण केंद्र निर्माण होत आहे. आतापर्यंत वीस बाय पन्नास चे बांधकाम झालेले आहे दोन बोर समाजाच्या दारातून पाडले दीड एकर जागा समाजाच्या दाणातून विकत घेतली अकरा फूट अखंड मार्बल मधील बुद्धाची मूर्ती दहा लाखाची समाजाच्या दानातून निर्माण करण्यात आली आहे.

दर महिन्याच्या १९ तारखेला भव्यस्वरूपामध्ये पौर्णिमेच्या अनुषंगाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. हजारो उपासक उपासिका शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहत असतात. याही मार्च महिन्याच्या १९ तारखेला भव्य स्वरूपामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे थायलंड येथून धम्म सहलीवरून परतलेल्या उपासक-उपासिकांचा जाहीर सत्कार सुद्धा संपन्न होणार आहे. हजारोच्या संख्येने उपासक उपाशीकाने दिनांक १९ मार्च २०२४ रोजी उपस्थित राहावे अशी आवाहन श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.



# पत्रकारिता करताना पत्रकारांनी आपल्या आरोग्याला जपावे

## आरोग्य शिबिराचा शेकडो पत्रकारांनी घेतला लाभ; आयुष्मान कार्ड योजनेत पत्रकारांची नोंदणी

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**वाशिम :** पत्रकारीता करत असतांना पत्रकारांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे या दृष्टीकोनातून व्हाईस ऑफ मिडीया व जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ९ मार्च रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या स्कील डेव्हपमेंट हॉलमध्ये आयोजीत पत्रकार आरोग्य शिबीर व आयुष्यमान कार्ड नोंदणी उपक्रमात जिल्हयातील शेकडो पत्रकारांनी सहभागी होत लाभ घेतला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे तर प्रमूख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा महाले, डॉ. बालाजी हरण, मानसोपचार तज्ञ डॉ. श्वेता मोरवाल, व्हॉईस ऑफ मिडीयाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, लॅब टेक्नीशियन सोनल मिश्रा, दंतरोग तंत्रज्ञ भाग्यश्री धात्रक, आयुष्यमान भारतचे जिल्हा व्यवस्थापक राजेंद्र पडघान, शुभम चव्हाण, हरी राळे, मनोविकृती तज्ञ सुनिल सुर्वे, राहुल कसादे, रामकृष्ण धाडवे, लॅब टेक्निशियन गणेश गोटे, राजकुमार पवार, सारीका काळे, शालीनी शेळके, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे जिल्हाप्रमुख वैभव टाकले, आरोग्यमित्र अब्दुल नदीम, अमोल वाकुडकर आदींची उपस्थिती होती. सर्वप्रथम व्हॉईस ऑफ मिडीयाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. अनिल कावरखे यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. अध्यक्षीय भाषणातून बोलतांना डॉ. कावरखे यांनी सामान्य रुग्णालयाच्या सुविधेबाबत माहिती दिली. ते म्हणाले की, गोरगरीब रुग्णांचा त्वरीत उपचार मिळावा यासाठी रुग्णालयात विविध सुविधा सुसज्ज आहेत. त्यामध्ये सिटी स्कॅन सेंटर, डायलेसीस सेंटर, हिमोफोलीया सेंटर, मानसोपचार युनिट, प्रिमॅच्युअर बेबी युनिट, प्रसुतीसेवा, सोनोग्राफी आदी सेवा मोफत स्वरुपात सुरु आहेत. रुग्णांना येथे २४ तास उपचारासाठी आम्ही सर्व तत्पर आहोत. पत्रकार बांधवांचे रुग्णालय प्रशासनाला नेहमीच सहकार्य मिळत असून पत्रकारांनीही पत्रकारीता करत असतांना आपल्या आरोग्याकडे विशेषकरुन लक्ष द्यावे. आजार होण्याच्या आधीच तपासणी करुन घेतल्यास होणार आजार वेळीच आटोक्यात आणता येतो. यानंतर डॉ. बालाजी हरण व इतर उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून व्हॉईस ऑफ मिडीयाने आयोजीत केलेल्या या उपक्रमाचे कौतूक केले.

कार्यक्रमानंतर शिबीराचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हयातील विविध भागातून आलेल्या पत्रकारांनी आपल्या रक्तदाब, शुगर, ईसीजी आदी आरोग्याची तपासणी करुन घेतली. तसेच शेकडो पत्रकारांच आयुष्यमान योजनेत नोंदणी करण्यात आली. कार्यक्रमाचे संचलन सुनिल सुर्वे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन राहुल कसादे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्हॉईस ऑफ मिडीयाच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या चमुने अथक परिश्रम घेतले.

# मनपा शिक्षण विभागाला पुरुष व महिला कबड्डीचे अजिंक्यपद

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** महानगरपालिका आयोजित अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम २०२४ मध्ये अहमदनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या पुरुषांच्या संघाला व महिलांच्या संघाला कबड्डी स्पर्धेचे अजिंक्य पद मिळाले.तसेच अनिल बडे यास बेस्ट रायडर तर विजय घिगे यांना बेस्ट डिफेंडर चषक देण्यात आला. त्याचबरोबर १०० मीटर धावणे,२०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे,गोळा फेक, लांब उडी, १०० मीटर व ४०० मीटर रिले, बॅडमिंटन, जलद चालणे, बुद्धीबळ, कॅरम या क्रीडाप्रकारांत मनपा शिक्षक व शिक्षिकांनी १०० पेक्षा जास्त पदकांची कमाई केली. जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क अहमदनगर येथे रविवारी अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रदीप पठारे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.सचिन धस यांच्या हस्ते क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. गीतगायनामध्ये भाऊसाहेब कबाडी, अरुण पवार, प्रीती जाधव, वृषाली गावडे, दिपाली नवले, ज्योती टाळके यांना उत्कृष्ट गायनाबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. मनपा शिक्षण विभागातील मनिषा शिंदे, मनिषा गिरमकर, वर्षा गायकवाड, दिपाली नवले, सीमा म्हस्के, गयाबाई गीते, सुरेखा घुले, छाया कुदांडे, सुवर्णा झिने, प्रीती जाधव, वृषाली गावडे, ज्योती टाळके,वर्षा दिवे, ज्योती गहिले, भाऊसाहेब कबाडी,अक्षय सातपुते, विजय घिगे, अमोल बोठे, अरुण पवार, सुनिल रोटे, योगेश राजळे, अनिल बडे, विठ्ठल आठरे, युवराज मोरे,शशिकांत वाघुलकर या खेळाडूंनी विविध क्रीडाप्रकारांत चमकदार कामगिरी केली. अहमदनगर महानगरपालिका शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.



# रिसोड येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाची आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** तालुक्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या जनसंवाद दौऱ्यानिमित्त वाशिम येथे दिनांक 13 मार्च बुधवारला सायंकाळी सहा वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिम च्या प्रांगणात जाहीर सभेचे आयोजन केले असून त्यानिमित्ताने सभेच्या नियोजनाचे संदर्भात शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख डॉक्टर सुधीर कव्हर जिल्हाप्रमुख सुरेश मापारी रिसोड विधानसभा सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात रिसोड येथील विश्व लॉन येथे दुपारी बारा वाजता आढावा बैठक घेण्यात आली या आढावा बैठकीमध्ये रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख रिसोड विधानसभा सुभाष बोरकर रिसोड तालुका प्रमुख नारायण आरु, रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी, डॉ . सुभाष मोरे जेष्ठ नेते,यांचे समायोचीत मार्गदर्शन आढावा सभेला करण्यात आले. वाशिम येथील जनसंवाद दौऱ्यानिमीत्त सभेला जास्तीत जास्त लोक उपस्थित राहावे व या सभेसाठी सर्वच लोकांना आमंत्रित करावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. आहे. या आढावा सभेला उपस्थित सर्वच आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. या आढावा सभेदरम्यान शिवसेना पक्षात समाधान बोडखे यांचा शिवबंधन बांधून विश्वनाथ सानप साहेब यांच्या माध्यमातून प्रवेश केला तर उपजिल्हाप्रमुख डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी समाधान बोडखे यांच्या गळ्यात रुमाल टाकून त्यांचे स्वागत केले.उपस्थितामध्ये शहरप्रमुख संजयभाऊ इरतकर, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेश देशमुख, युवासेनेचे तालुकाप्रमुख गजानन सानप, शहर प्रमुख संजय भाऊ इरतकर, युवासेनेचे शहर प्रमुख कैलास ठोकरे, उपतालुकाप्रमुख प्रकाश तात्या चोपडे, गजानन खोडके, डॉ. समाधान काठोळे, सर्कल प्रमुख सुनील अल्हाट, गजानन बोडखे, शिवाजी सोनुने ,खंडू वानखडे, प्रल्हाद देशमुख, सुनील नागरे, राजेश सानप,परमेश्वर कांबळे, रामू रंजवे, मारोटकर, ज्ञानबा बोरकर , दिलीप चोपडे, परसराम बगाडे, किशोर काळे, धनंजय माळेकर श्याम देशमुख, ओंकार राजुरकर, राजुभाऊ कोकाटे, संतोष सपकाळ, विजय बोंडे यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोणंदच्या विद्यालयात महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज मुलींचे लोणंदच्या विद्यालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. लोणंद नगरीच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सीमा खरात या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्यालयाच्या प्राचार्या सुनंदा नेवसे यांनी भूषविले. विद्यालयाचे पर्यवेक्षक नेवसे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयातील नववी क च्या विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, सिंधुताई सपकाळ, कल्पना चावला, आनंदीबाई जोशी, अशा सर्वांचे प्रेरणास्थान असलेल्या महिलांचा जीवनपट हा वेशभूषेसह एकांकिकेतून सादर केला. सर्वच महिलांचा विद्यार्थिनींद्वारे यथोचित सन्मान करण्यात आला. विद्यार्थीनींसाठी शालेय पोषण आहार शिजवणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. विद्यार्थिनी तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक शपोळसर याच बरोबर प्रमुख पाहुण्या नगराध्यक्षा सीमा खरात मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यालयाच्या प्राचार्या सुनंदा नेवसे यांनी आपल्या मनोगतात सद्यस्थितीला महिलांपुढील आव्हाने आणि ती आव्हाने पेलण्यासाठी मार्गदर्शनही केले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा इयत्ता नववी क च्या विद्यार्थिनींनी यशस्वीरित्या पेलली.उपशिक्षिका शुभांगी ननावरे यांनी सर्वांचे आभार मानले व शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आला.

# रस्त्यावर थरार; धावत्या मिनीबसवर गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** शेगाव येथील संत गजानन महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन नागपूर येथे परत जात असलेच्या नागरिकांच्या खासगी प्रवासी मिनीबसवर बोलेरोमधून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात चार जण जखमी झाले आहे. ही थरारक घटना अमरावती-नागपूर महामार्गावर रविवारी मध्यरात्री शिवणगाव नजीक घडली. नागपूर येथील भाविक पर्यटक एमएच १४ / जीडी ६९५५ क्रमांकाच्या १७ आसनी टेम्पो ट्रॅव्हलमधूनन रविवारी शेगाव येथे दर्शनासाठी गेले होते. सायंकाळी ते शेगावहून परतीच्या प्रवासाला निघाले. त्यांचे वाहन अमरावतीहून नागपूरकडे जात असताना शिवणगाव ते टोलनाक्याच्य दरम्यान नागपूर येथून येत असलेल्या एका बोलेरो वाहनाने वळण घेऊन पर्यटकांच्या वाहनाचा पाठलाग सुरू केला. काही वेळाने बोलेरो वाहन समोर गेले आणि या वाहनातील हल्लखोरांनी टेम्पो ट्रॅव्हलरवर गोळीबार सुरू केला. यात एक गोळी चालक खोमदेव कवडे यांच्या हाताला स्पर्श करून गेल्याने ते जखमी झाले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# कोणतेही काम निष्ठेने करा : पोउपनि कांबळे

## राजे सिद्धार्थ बुद्धविहारात सत्कार कार्यक्रम समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** टीव्ही व मोबाईलच्या अति वापरापासून दूर राहावे.गरजेपुरता वापर करावा. त्याचबरोबर परिश्रम व प्रामाणिकपणे काम केल्याशिवाय पर्याय नाही कोणतेही काम निष्ठेने करा असे प्रतिपादन पोलीस उपनिरीक्षक चेतन कांबळे यांनी केले.ते शिरवळ ता.खंडाळा येथे आयोजित करण्यात कार्यक्रमात बोलत होते.चेतन कांबळे हे शिरवळचे रहिवाशी असून नुकतीच त्यांनी पोलीस उपनिरीक्षक या पदाला गवसणी घातली आहे.या यशाबद्दल त्यांचा सत्कार करीत अभिनंदन करण्यात येत आहे.राजे सिद्धार्थ बुद्धविहारात शिरवळ ग्रामस्थ व राजे सिद्धार्थ तरुण मंडळ व दर रविवारी चला बुध्द विहारी धम्म जागृती साक्षरता अभियानाच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक चेतन कंबके यांचा सत्कार करण्यात आला.तसेच विविध कार्यकारी सोसायटीच्या व्हाईस चेअरमन पदी दादासाहेब कांबळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा ही सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला चेतन कांबळे यांची सुविद्य पत्नी कल्याणी कांबळे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तसेच दादासाहेब कांबळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करण्यात आले.शिरवळ गावचे सरपंच रविराज दुधगावकर यांच्या हस्ते चेतन कांबळे व दादा कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.समाजकारण आणि राजकारण एका बाजूला ठेवून एकत्र येऊन गावचा आणि समाजाचा प्रगती केली पाहिजे, असे दादासाहेब कांबळे यांनी म्हटले.चेतन कांबळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी झालेली नियुक्ती ही शिरवळ गावच्या वैभवात भर टाकणारी गोष्ट आहे.असे मत सरपंच रविराज दुधगावकर यांनी व्यक्त केले.संजय जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# फुलंब्री शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात दि. 8 मार्च रोजी मध्यरात्री पर्यंत डीजे वाजत व फटक्यांची आतिषबाजी करून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा दाखल करण्यात आला असून तर पुढील काही दिवसांत पुतळ्याचे लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे, अशी माहिती नगरपंचायत प्रशासनाकडून देण्यात आली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवीन पुतळा बसविण्यासाठी फुलंब्री शहरातील नागरिकांच्या वतीने मागणी करण्यात आली होती. यानंतर प्रशासनाच्या वतीने पत्रव्यवहार करून पुतळा परिसर सुशोभीकरण करुन पुतळा दाखल करण्यात आला. यासाठी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक ऋषिकेश भालेराव यांनी जिल्हास्तरीय शासन व प्रशासनाला पत्रव्यवहार करत मान्यता मिळवून पुतळा परिसर सुशोभीकरण करण्यात आले. दि. 8 मार्च रोजी मध्यरात्री पर्यंत डीजे वाजत गाजत फटाक्यांची आतषबाजी करून समाजबांधवांनी जल्लोष साजरा केला. औरंगाबाद हुन पुतळा आणण्यात आले रस्त्यावर जागोजागी पुतळ्याला अभिवादन करत हार नागरिकांच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी फुलंब्री नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक ऋषिकेश भालेराव, माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाट, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र ठोंबरे, जेपी शेजवळ, अजय गंगावणे, भगवान गंगावणे, बाबासाहेब गंगावणे, रोशन अवसरमल, फुलंबी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय सहाने, पोलिस उपनिरीक्षक श्रीनिवास धुळे, एपीआय खाडे, तालाठी गायकवाड, माजी नगरसेवक जफर चिश्ती गणेश राऊत, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मिक जाधव, सतीश वाघ, बाबासाहेब शिंगारे आवेज चिश्ती एकनाथ ढोके माजी उपनगराध्यक्ष अकबर पटेल, पत्रकार सरफराज पटेल,वंचित बहुजन आघाडी च्या तालुका अध्यक्ष पुष्पा मोरे, रंजीत वाहुळ यांच्यासह भीम सैनिकांची उपस्थिती होती.

# गुरुकुलचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे गुरुकुल बहुउदेशीय सेवाभावी प्रतिष्ठान संचालित - गुरुकुल विद्यामंदीर व कनिष्ठ महाविद्यालय वडोद बाजार ता फुलंब्री यांच्या वतीने वार्षिक स्नेह संमेलन आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषीक वितरण आणि गौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ग्लोबल पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज च्या गुरुकुल विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालयात दि. ७ मार्च रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन फुलंब्री पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय सहाने यांच्या हस्ते करण्यात आले, प्रमुख पाहुणे म्हणून आप्पासाहेब पाटील काकडे (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री), पाकीजा पठाण (सरपंच वडोद बाजार) डॉ. गोपालभाऊ वाघ (उपसरपंच वडोद बाजार) वडोद पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक संभाजी खाडे देविदास सास्ते ( पो हे कॉ फुलंब्री पोलीस स्टेशन) शेख रज्जाक, प्रफुल शिंदे, गोविंद पांडेजी, साबेर पठाण, मधुकर म्हस्के , पत्रकाद दादासाहेब काळे हे यावेळी उपस्थित होते, तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भा. ना गाडेकर (गुरुकुल बहुउद्देशीय सेवाभावी प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष) हे उपस्थित होते, कार्यक्रमादरम्यान मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला, त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपले कला गुण प्रेक्षकांसमोर सादर केले, कार्यक्रमांमध्ये मनोरंजनासोबत सामाजिक संदेश देखील देण्यात आला .
चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने नृत्य करून पालक प्रेक्षकांचे मने जिंकली होती, व प्रेक्षकांनी देखील मुलांना खूप मोठा प्रमाणात प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋचा बोरसे यांनी केले कार्यक्रमाचे आभार सुनिता पवार (प्राचार्य गुरुकुल वरिष्ठ कॉलेज आळंद) यांनी मानले.
यावेळी दादाराव मानकापे (प्राचार्य गुरुकुल विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय), रामेश्वर तुपे (मुख्याध्यापक ग्लोबल पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ) सहशिक्षक काकासाहेब पवार, संकेत गाडेकर, सहशिक्षिका वर्षा ठोंबरे, वर्षा गायकवाड, पूजा तायडे, अर्चना जंजाळ, रवींद्र तायडे, (शिपाई) लिलाबाई कव्हाळे (सेविका) शाळेचे विद्यार्थी, पालक, वडोद बाजार येथील गावकरी, पंचक्रोशीतील नागरीक उपस्थित होते.



# जागतिक महिला दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लोहगड नांद्रा येथे जागतिक महिला दिन व महाशिवरात्री निमित्त भारतीय जनता पार्टी फुलंब्री तसेच एम जी एम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व रोगनिदान व मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. या शिबिरास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला.
या शिबिरासाठी भाजपा जेष्ठ नेत्या तथा देवगिरी बँकेच्या संचालिका श्रीमती मंगलताई वाहेगावकर(काकू), भाजपा जिल्हा सरचिटणीस सौ. ऐश्वर्याताई अभिषेक गाडेकर, भाजपा महिला मोर्चा छत्रपती संभाजीनगर तालुकाध्यक्षा श्रीमती सरसाताई वाघ, फुलंब्री भाजपा महिला मोर्चा तालुकाध्यक्षा सौ. सविता नवले, अभिषेक पा. गाडेकर, निजाम पठाण, खेमचंद राठोड, सुरेश गवंडर, निवृत्ती पा. तरटे, सागर लकडे, संतोष लकडे, प्रदीप आघाडे, बाबुराव तरटे, अक्षय जाधव, ज्ञानेश्वर तरटे तसेच विविध पदाधिकारी, परिसरातील नागरिक यांच्यासह सर्व एमजीएम हॉस्पिटलचे डॉक्टर, कर्मचारी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर